❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती **सोमवार, दि. ०२ नोव्हेंबर २०२६** ❖ पाने : ८ ❖ अंक : ३०७ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या** निःपक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



काँग्रेसची लढाई भारत अन् संविधानासोबत

राहुल गांधींच्या पक्षाला चीनकडून डोनेशन का मिळते? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा घणाघात



■ ठाणे (दै. संध्या)

काँग्रेस आणि त्यांच्या सहकाऱ्यांची खरी लढाई ही भारत आणि संविधानासोबत आहे. त्यामुळेच आपल्याला त्यांच्याविरोधात मैदानात उतरावे लागले आहे. याचा इतिहास पाहिला तर, 1975 मध्ये दिवंगत इंदिरा गांधी यांनी भ्रष्ट मार्गाने निवडणूक जिंकली होती, तेव्हा न्यायालयाने त्यांची निवडणूक रद्द ठरवली होती. आज आम्हाला लोकशाहीचे धडे देणाऱ्या काँग्रेसने इंदिरा गांधींच्या कार्यकाळात काय झाले, याचा विचार केला पाहिजे. त्यावेळी संविधानाची मोडतोड करत न्यायालय आणि लोकशाहीला संपवण्याचे काम काँग्रेसने केले. आज वोट चोरीचा आरोप करणाऱ्या याच लोकांनी प्रत्यक्षात संविधान चोरी केली आहे, असा हल्लाबोल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. ठाण्यात भाजपच्या लोकतंत्र बचाव पदयात्रेत बोलताना मुख्यमंत्र्यांनी असे म्हटले आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आता इंदिरा गांधींचे नातू तेच जुने राजकारण घेऊन पुन्हा मैदानात उतरले आहेत. राहुल गांधी कायम परदेशात फिरत असतात, ते कशासाठी जातात? भारताला नेहमी पाण्यात पाहण्याचे काम चीन करत असतो. मग राहुल गांधींच्या पक्षाला आणि त्यांच्या ट्रस्टला चीनकडून डोनेशन का मिळत आहे? चीनच्या पैशावर भारतामध्ये अराजकता पसरवण्याकरिताच काँग्रेस रस्त्यावर उतरली आहे का? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सध्या एक नवीन 'लाल पुस्तक' आणले गेले आहे. हे लाल संविधान हा केवळ त्यांचा एक मुखवटा आहे. याच लाल पुस्तकाचा वापर करून नेपाळ, श्रीलंका आणि बांगलादेशची अवस्था बदलण्यात आली आणि आता तीच रणनीती भारतात राबवली जात आहे. हातात लाल संविधान घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाने निर्माण केलेल्या एक-एक संस्थांना बदनाम करण्याचे षडयंत्र हे लोक रचत आहेत.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारताच्या संविधानाने निर्माण केलेल्या सर्वोच्च न्यायालयावर हे लोक मोर्चे नेत आहेत, हीच खरी अराजकता आहे. सुप्रीम कोर्टावर मोर्चे काढले जात असताना 'संविधान वाचवा' असे म्हणणारे गप्प का आहेत? यांना भारताची लोकशाही आणि संविधान नको आहे, त्यांना देशात अराजकता निर्माण करायची आहे. जनतेने त्यांचे हे षडयंत्र समजून घेतले पाहिजे. चीनची 'लाल व्यवस्था' भारतात आणण्यासाठीच हा सर्व घाट घातला जात आहे. आम्ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मूळ संविधान वाचवण्यासाठी रस्त्यावरही उतरू शकतो.

काँग्रेसनेच गोठवले होते नागरिकांचे मूलभूत अधिकार

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत भाषण करताना सांगितले होते की, या संविधानात सर्वात महत्त्वाचे काही असेल तर ते भारतीय नागरिकांना दिलेले मूलभूत अधिकार आहेत, जे देशात समानता आणतात. मात्र, याच काँग्रेसने 1976 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले मूलभूत अधिकार गोठवून टाकले होते आणि मूलभूत अधिकारांसाठी कोणालाही सुप्रीम कोर्टात जाता येणार नाही, अशी दडपशाही चालवली होती. पुढे 1977 मध्ये जनता पक्षाचे सरकार आल्यानंतर हे अधिकार देशवासीयांना पुन्हा परत देण्यात आले.

सुशील कराडवर विनयभंगाचा गुन्हा दाखल

महिलेचे गंभीर आरोप; वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून चौकशीची मागणी



■ बीड (दै. संध्या)

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात सध्या कारागृहात असलेल्या वाल्मीक कराड याचा मुलगा सुशील कराड याच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. सुशील कराडवर एका महिलेच्या घरात घुसून बंदुकीचा धाक दाखवत जीवे मारण्याची धमकी देणे, विनयभंग करणे आणि 'पोक्सो' कायद्यांतर्गत गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पीडित महिलेने परळी पोलिसांच्या तपासावर तीव्र अविश्वास व्यक्त केला आहे. परळी पोलिसांवर आमचा अजिबात विश्वास नसून, या गुन्ह्याची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी व्हावी आणि हा तपास सोलापूर पोलिसांकडे सोपवावा, अशी थेट मागणी पीडितेने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे माध्यमांशी बोलताना केली आहे. पीडितेने आपल्या व्यथा मांडताना सांगितले की, आमचा प्रचंड छळ करण्यात आला असून माझ्या पतीला जबर मारहाण करण्यात आली आहे. आमच्या गाड्या ओढून नेण्यात आल्या आणि आमचे फ्लॅट देखील बळकावले आहेत. विशेष म्हणजे, या संपूर्ण प्रकरणात विजयकुमार ससाने आणि सचिन सानप हे पोलिस कर्मचारीही सहभागी असल्याचा गंभीर आरोप करत, या प्रकरणाचा तपास सोलापूरच्या एमआयडीसी पोलिसांकडूनच व्हावा, असा आग्रह महिलेने धरला आहे. झालेल्या मारहाणीत पीडितेच्या पतीच्या कानाचा पडदा फाटला होता. त्यावेळी या कुटुंबाने वाल्मिक कराडची भेट घेतली होती. तेव्हा वाल्मीकने, "तुम्ही आधी ऑपरेशन करून घ्या, परत आल्यावर मी तुम्हाला सगळं परत देतो आणि सुशीललाही समजून सांगतो," असे आश्वासन दिले होते. मात्र, आजवर त्यांना त्यांचे काहीही परत मिळालेले नाही. या सततच्या त्रासाविरोधात 2024 मध्येच तक्रार देऊनही राजकीय दबावामुळे कोणतीही कारवाई झाली नसल्याचे पीडितेचे म्हणणे आहे. सोलापूर एमआयडीसी पोलिस ठाण्यात आणि सोलापूर पोलिस आयुक्तालयात तक्रार करूनही कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अखेर त्यांना न्यायालयात जावे लागले. सुशील कराड आणि त्याच्या साथीदारांनी थेट सोलापुरात येऊन आपल्याला मारहाण केली आणि फोनवर शिवीगाळ केल्याचा आरोपही या महिलेने केला आहे.

थोडक्यात...

पुण्यात पुन्हा पावसाचा जोर वाढला!

पुणे : दैनिक संध्या

पुणेकरांना नोव्हेंबरच्या सुरुवातीलाच पावसाचा सामना करावा लागत आहे. रविवारी (१ नोव्हेंबर) पहाटे शहरातील काही भागांत जोरदार पाऊस झाला. त्यानंतर सायंकाळी पुन्हा औंध परिसरात पावसाचा जोर वाढला. शहराच्या इतर भागांतही पावसाच्या सरी कोसळल्या. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची धावपळ झाली असून, काही ठिकाणी जनजीवनावरही परिणाम झाला आहे. ऐन हिवाळ्याच्या सुरुवातीला पावसाने हजेरी लावल्याने पुणेकरांना अनपेक्षितपणे पावसाचा सामना करावा लागत आहे. पहाटेच्या सुमारास धायरी, आंबेगाव आणि सिंहगड रस्ता परिसरात पावसाचा जोर अधिक होता. सकाळी साडेसहापर्यंत या भागांत पाऊस सुरू असल्याची माहिती आहे. सुसगाव परिसरातही जोरदार सरी कोसळल्या. याशिवाय सुस रोड, पाषाण, बाणेर, बावधन, वारजे, औंध आणि नांदेड सिटी परिसरातही पावसाची नोंद झाली. मात्र, संपूर्ण शहरात एकाच वेळी मुसळधार पाऊस झाला नसून, काही भागांतच त्याचा जोर अधिक होता. दरम्यान, पावसामुळे पुण्यातील बहुप्रतीक्षित मेट्रो लाईन-३ च्या कामाबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत. येत्या ३ नोव्हेंबरला पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शिवाजीनगर ते मान-हिंजवडी मेट्रो मार्गाचं लोकार्पण होणार आहे. मात्र, उद्घाटनाला अवघे काही दिवस शिल्लक असताना मान मेट्रो स्टेशनच्या आवारात पावसाचं पाणी गळत असल्याचा प्रकार समोर आला आहे.

गृहमंत्री म्हणून पांडू हवालदार आहात, हर्षवर्धन सपकाळांचा देवेंद्र फडणवीसांवर हल्लाबोल

■ मुंबई (दै. संध्या)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तुम्ही घाशीराम कोतवाल आहात आणि गृहमंत्री म्हणून पांडू हवालदार आहात, महाराष्ट्रात अराजकता शिगेला पोहचली आहे, महाराष्ट्रात कायदा नावाचा विषय हा अस्तित्वात शिल्लक राहिलेला नाही, अशा शब्दात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी हल्लाबोल केला. मुख्यमंत्री रामलीला मैदान रॅलीवर चीन फंडिगचा आरोप केल्यानंतर सपकाळ यांनी प्रत्युत्तर दिले.

सपकाळ म्हणाले, तुम्ही संविधानाची पायमल्ली करत आहात. तुम्ही धादांत खोटं बोलत आहात आणि तुम्ही वोटचोरी आणि पक्षफोडून सत्तेत आला आहात. चीन फंडिंगवर बोलताना सपकाळ म्हणाले, केंद्रीय गृह मंत्रालय तुमच्या ताब्यात आहे. त्यामुळे आरोप करत असताना तुम्हाला सरकार चालवता येत नाही यातून दिसून येत आहे, असा टोला त्यांनी लगावला. काँग्रेस नेते विजय वड्डेटीवार म्हणाले की, मुख्यमंत्र्यांना माझं विचारणं आहे अराजकता कुठं दिसली? मतचोरी करून तुम्ही सरकार बनवून पाप केलं आहे. तुम्ही जनतेच्या नाही तर चोरांच्या भरवशावर सरकार स्थापन केलं आहे. आजच्या रॅलीत कुठं अराजकता दिसली? असा सवाल त्यांनी केला. राहुल गांधी यांच्या नावाची भीती आणि धाक यांच्या डोक्यात घुसल्याने हे अराजकता म्हणत आहेत, चीन कडून फंडीग घेतो, तर आरोप करण्यापेक्षा पुरावे शोधा, असा टोला त्यांनी लगावला. सतेज पाटील म्हणाले की, निवडणुका चोरल्या जातात हे सातत्याने राहुल गांधी सांगत आहेत. ज्ञानेश कुमार यांच्यावरील आरोप हे सत्य आहे दुर्दैवाने. भाजप त्यांची भूमिका मांडत आहे. जे चुकीचं सुरू आहे ते थांबलं नाही तर लोकांचा लोकशाहीवर विश्वास राहणार नाही. मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्यावर बोलताना ते म्हणाले की, कायम डायव्हर्स वक्तव्य मुख्यमंत्री करत असतात, मूळ विषयावर बोलत नाहीत. आंदोलन केलं तर चुकलं काय? अशी विचारणा त्यांनी केली. ट्रकभर पुराव्याचे त्यांनी आरोप केले, पुढे काय झालं सगळ्यांनी पाहिलं आहे. मूळ विषय सोडून डायव्हर्स स्टेटमेंट करण्याचा मुख्यमंत्र्यांचा स्वभाव असल्याची टीका सतेज पाटील यांनी केली.



■ चीन फंडिग म्हणता, तर केंद्रीय गृह मंत्रालय तुमच्या ताब्यात, सतेज पाटील, वडेट्टीवारांचाही प्रहार

शेतकऱ्यांना त्रास देऊ नका, कंपनीला आडवे करू : एकनाथ शिंदे



■ नांदेड (दै. संध्या)

राज्यात सध्या दिवाळीचा उत्साह असून यंदाच्या दिवाळीवर दुष्काळाचे सावट आहे. त्याच पार्श्वभूमीवर सरकारकडून शेतकऱ्यांना मदत देण्याचा प्रयत्न होत आहे. शेतकऱ्यांना दुष्काळग्रस्त भागात 5000 रुपयांची अग्रीम मदत निधी रक्कम थेट बँक खात्यावर पाठवण्यात आली आहे. दुसरीकडे विविध विकासकामांचेही उद्घाटन व लोकार्पण करण्यात येत आहे. नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील विविध विकास कामांचे लोकार्पण व उद्घाटन आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी, वसुलीसाठी शेतकऱ्यांना त्रास देणाऱ्या फायनान्स कंपन्यांना त्यांनी थेट इशारा दिला. शेतकऱ्यांना त्रास देऊ नका, अन्यथा मायक्रो फायनान्स कंपनीला आडवे करू, असे शिंदेंनी म्हटले. नांदेडमधील या कार्यक्रमासाठी आज मोठ्या संख्येने बांधव उपस्थित आहेत, ही कष्टकरी लोकांची भूमी आहे. लाडक्या बहीण, लाडक्या भावाची भूमी आहे. विकासकामांचे लोकार्पण झाले असून अशोक चव्हाण, हेमंत पाटील सर्व आमदार उपस्थित आहेत. बालाजी कल्याणकर यांनी प्रयत्न केले, चांगली इमारत प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनात झाली. त्यासाठी, साडे तीन हजार कोटीचा निधी सरकारने दिला आहे. माझ्याकडे आरोग्य विभाग होता, आता प्रकाश आबिटकर यांनी आरोग्य संवाद यात्रा सुरू केली आहे. लोकापर्यंत निर्णय पोहचत नाही, लोकांच्या जीवाशी खेळणाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. आम्ही उठाव केला त्यावेळेला बालाजी आमच्यासोबत होता, बालाजी कल्याणकर नुसतं काम घेऊन येत असतो. आज चाऱ्याचे, पाणी टँकरचे उद्घाटन केले. बळीराजा संकटात आहे. दुष्काळ अतिवृष्टीमध्ये सरकार मजबूत होते, लोकांना भेटलो तेव्हा दुष्काळ जाहीर करा अशी मागणी केली. त्यानंतर, आम्ही मंत्रालयात बैठक घेत मदत जाहीर केली. शेतकऱ्यांना पाच हजार रुपये मदत दिली, त्याला कॅबिनेटमध्ये मान्यता दिली. सरकार शेतकऱ्यांच्या मागे आहे, कुणालाही वाऱ्यावर सोडणार नाही, असेही एकनाथ शिंदेंनी म्हटले.

वाईट विचार करु नका, चुकीचा निर्णय घेऊ नका. शेतकऱ्यास त्रास दिलेल्या मायक्रो, फायनान्स कंपनीच्या कर्मचाऱ्यांवर हत्येचा गुन्हा दाखल केला, शेतकऱ्यांना त्रास देऊ नका अन्यथा मायक्रो, फायनान्स कंपनीला आडवे करू, आम्ही शेतकऱ्यांचा खुनी म्हणून कारवाई करु अशा शब्दात एकनाथ शिंदेंनी पुन्हा एकदा वसुलीचा तगादा लावणाऱ्यांना दम भरला. शेतकऱ्यांच्या मुलींसाठी सामूहिक विवाह मेळावे घेणार आहोत, अशी माहितीही त्यांनी दिली.

शिंदेंचा विरोधकांना टोला

रात्री येऊन उद्घाटन कशाला करता, दिवसा या. विकास कामात राजकारण करु नका, ही वेळ शेतकऱ्यांना मदत करण्याची आहे, असे म्हणत विरोधकांना टोला लगावला. लाडक्या बहिणींना दीड हजार दिले. विरोधकांनी योजना बंद पडेल अशी वल्गना केली. पण, कोणी मायका लाल आला तरी लाडकी बहीण योजना बंद होणार नाही. आम्ही कामातून उत्तर देणार आहोत, असे म्हणत एकनाथ शिंदेंनी सगळ्यांना येणाऱ्या दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

रामलीला मैदानात इंडिया आघाडीची अभूतपूर्व रॅली

ज्ञानेश कुमार जेलमध्ये जाणार, २०२४ लोकसभा निवडणूक अवैध, ममता, अखिलेश अन् तेजस्वी यादवांचाही प्रहार

■ मुंबई (दै. संध्या)



ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या आणि एसआयआरच्या निषेधार्थ इंडिया ब्लॉकने दिल्लीत अभूतपूर्व रॅली काढली. चार तास चाललेल्या या आंदोलनात 20 विरोधी पक्षांनी सहभाग घेतला. डाव्या पक्षाचे नेते एम. ए. बेबी, तेजस्वी यादव, मल्लिकार्जुन खर्गे, अखिलेश यादव, ममता बॅनर्जी, फारुख अब्दुल्ला, मेहबूबा मुफ्ती आणि अखेरीस राहुल गांधी यांनी रामलीला मैदानावर भाषणे दिली. राहुल म्हणाले, "मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी मतचोरीचा कट रचला आहे आणि त्यांना तुरुंगात जायलाच हवे." मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले, "ते अंडरवर्ल्डमध्ये गेले तरी आम्ही त्यांना शोधून परत आणू. आम्ही त्यांना सोडणार नाही." अखिलेश यादव यांनी उत्तर प्रदेशचा उल्लेख करत म्हटले की, जे एकदा उत्तर प्रदेशातून आले होते, ते आता उत्तर प्रदेशातूनच निघून जातील. "जर उत्तर प्रदेशातील लोकांनी त्यांचे चांगले स्वागत केले, तर ते त्यांना चांगला निरोपही देतात. 2027 मध्ये त्यांचे जाणे निश्चित आहे." गेल्या 25 दिवसांत विरोधी पक्ष या मुद्द्यावर एकत्र येण्याची ही सातवी वेळ होती. यापूर्वी, त्यांनी 6 ते 13 ऑक्टोबर दरम्यान सहा वेळा आंदोलन केले होते.

राहुल गांधी म्हणाले, "ज्ञानेश कुमार यांना रात्री झोप लागत नाही. ते घाबरले आहेत. त्यांनी सर्वात मोठा गुन्हा केला आहे. त्यांनी राष्ट्राचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला, तो दडपून टाकला." ते पुढे म्हणाले, "मोदी आणि शाह या दोघांनाही झोप लागत नाही. आम्ही वैरभाव बाळगणारे लोक नाही. आपल्याला द्वेष नाही, तर प्रेम पसरवायचे आहे. हे आंदोलन कोणत्याही एका पक्षासाठी, कोणत्याही एका नेत्यासाठी नाही. हे आंदोलन राष्ट्रासाठी आहे. हा राष्ट्राचा आवाज आहे, संविधान वाचवण्याचा आवाज आहे."

ते म्हणाले, "मी तुम्हाला सांगतो, मोदी कुठेही जाऊ शकत नाहीत. जरी त्यांना जायचे असले तरी, आम्ही त्यांना जाऊ देणार नाही. ज्ञानेश कुमार यांच्यानंतर आम्ही तुमच्यासमोर उभे राहणार आहोत. तुमच्या मतचोरीविरोधात कायदेशीर कारवाई केली जाईल. देशाला न्याय मिळेल." राहुल पुढे म्हणाले, "ज्यासाठी तुम्ही देश अदानींना विकला, त्याचा आम्ही बदला घेऊ. आम्ही तुम्हाला पळून जाऊ देणार नाही; तुम्ही इथेच राहाल." कारवाई केली जाईल. ते म्हणाले, "आमच्यात आणि त्यांच्यात फरक आहे. हा देश द्वेषाचे ठिकाण नाही. आम्ही मोदी-शाह ज्ञानेश यांचा द्वेष करत नाही. आम्ही प्रेमाचे दुकान चालवणारे लोक आहोत. मोदी-ज्ञानेश यांनी देशाच्या आत्म्यावर, संविधानावर आणि लोकशाहीवर हल्ला केला आहे. आम्ही हे सहन करणार नाही."



न्यूझीलंडने भारताला ७ विकेटने हरवले

■ हॅमिल्टन (दै. संध्या)

■ सायफर्टने ९३ धावा केल्या; श्रेयस-इशानची अर्धशतके व्यर्थ, टीम इंडियाने ३-२ ने जिंकली मालिका

भारतीय संघ न्यूझीलंडविरुद्धचा पाचवा टी२० सामना ७ गडी राखून हरला. मात्र, भारतीय संघाने मालिका ३-२ अशी जिंकली. हॅमिल्टन येथे, किवी संघाने १८ षटकांत ३ गडी गमावून १९२ धावांचे लक्ष्य पूर्ण केले. टिम सायफर्टने ५० चेंडूंमध्ये ९३ धावा केल्या. ग्लेन फिलिप्सने नाबाद ६५ धावांची खेळी केली. भारताकडून अर्शदीप सिंग, वरुण चक्रवर्ती आणि नितीश रेड्डी यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. यापूर्वी शुक्रवारी, नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना, भारतीय संघाने २० षटकांत ८ गडी गमावून १९१ धावा केल्या. इशान किशनने ३२ चेंडूंमध्ये ६१ धावा केल्या. कर्णधार श्रेयस अय्यरने २३ चेंडूंमध्ये ५० धावांची खेळी केली. न्यूझीलंडच्या ॲडम मिल्नेने ४ बळी घेतले.

भारत: अभिषेक शर्मा, संजू सॅमसन, ईशान किशन (यष्टीरक्षक), श्रेयस अय्यर (कर्णधार), तिलक वर्मा, नितीश कुमार रेड्डी/शिवम दुबे, नमन धीर, अक्षर पटेल, भुवनेश्वर कुमार/अर्शदीप सिंह, प्रिन्स यादव, मयंक यादव.

न्यूझीलंड: फिन ॲलन, टिम सायफर्ट (यष्टीरक्षक), डॅरिल मिचेल, ग्लेन फिलिप्स, बेवन जेकब्स, मायकेल ब्रेसवेल, मिचेल सँटनर (कर्णधार), नॅथन स्मिथ, ॲडम मिल्न, जेकब डफी, मॅट फिशर.

संपादकीय

तुझे माझे जमेना

विधान परिषदेच्या पदवीधर, आणि शिक्षक मतदार संघाच्या चुरशीच्या निवडणुकीत सत्ताधारी महायुतीतील भाजप, व शिंदेचे शिवसेनेला प्रत्येकी एक जागा अशा या दोन जागा जिंकता आल्याने आता या पराभवाचे खापर दोन्ही पक्षाचे नेते एकमेकांवर फोडत आहेत. "बारा पक्ष बदलून आलेला तो माकडछाप आम्हाला काय शिकवतो?... "अशी टिप्पणी भारतीय जनता पक्षाच्या प्रवक्त्याने शिंदे सेनेच्या एका माजी आमदारावर केल्याने वातावरण अधिकच चिघळल्याचे दिसते. या पराभवाबद्दल मुख्यमंत्र्यांनी नरमाईची भूमिका घेतल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्याच मतदारसंघात त्यांच्याच उमेदवाराचा झालेला दारुण पराभव होणे, हे त्यांच्या जिव्हारी लागणे साहजिकच आहे.आता फडणवीस आणि शिंदे या दोघांचाही चेंडू अमित शहा यांच्या न्यायालयात गेल्यानंतर दोघांनाही सबूरीचे बोल देऊन शांत केले जाईल, कारण सत्तेसाठी घेतलेली कुबडी काढून घेणे, दोघांनाही व दोन्ही पक्षाना परवडणारे नाही.अशी कार्यकर्त्यात चर्चा आहे. निवडणूक निकालानंतर आता भारतीय जनता पक्ष आणि शिंदे शिवसेना यांच्यामध्ये सुंदोपसुदीचे कवित्व सुरू झाले आहे. महायुतीतील घटक पक्ष भाजपा व शिदेसेना एकमेकावर तुटून पडलेले आहे, पुणे, नागपूर,व छत्रपती संभाजीनगर येथील पदवीधर मतदार संघ आणि पुणे, व अमरावती येथील शिक्षक मतदार संघातील लढतीत एकाच राज्यात एकाच मतदार यंत्रणेतून दोन परस्पर विरोधी कौल निघाले. शिक्षकांनी महायुतीचे उमेदवारांना भरभरून मते दिली. तर पदवीधरांनी तिन्ही जागा विरोधकांच्या पदरात टाकल्या, पाचही जागा आम्ही जिंकू असा दावा करणाऱ्या महायुतीला केवळ दोनच जागांवर समाधान मानावे लागले. यातील विरोधाभास उलगडल्याशिवाय या निकालाचा अर्थ समजणार नाही. कारण महायुतीच्या अपयशाचे खरे कारण विरोधकाची ताकद नाही, युतीच्या स्वतःच्या घरात पसरलेला सावळा गोंधळ आहे. मुळात वाद कशावरून होता?...तर जागा वाटपावरून?.. पुण्यातील एका जागेची मागणी शिवसेनेने पहिल्या दिवसापासून केली होती. भाजपने पुणे पदवीधर, पुणे शिक्षक, व नागपूर पदवीधर, या तीन जागा स्वतःकडे ठेवल्या. पुणे विभागात राष्ट्रवादी अजित पवार पक्षाला एकही जागा न मिळाली नाही,त्यामुळे त्या पक्षाची यंत्रणा उत्साहाने रणांगणात उतरली नाही. पुणे शिक्षक मतदार संघात शिवसेनेचे अधिकृत उमेदवारांनी माघार घेतल्यानंतरही शिवसेना पक्षाने अपक्ष सचिन सानप यांना पाठिंबा दिला. नागपूरात भाजपचे माजी आमदार अनिल सोले पाटील यांनी शेवटपर्यंत अर्ज मागे घेतला नाही, सोशल मीडियावरील अपक्ष नितीन कराळे मास्तर यांनी सुमारे २५००० मते घेतली. आणि त्यांची दुसऱ्या पसंतीची मते कॉंग्रेसचे अभिजीत वंजारी यांच्याकडे वळली.छत्रपती संभाजीनगर मध्ये भाजपने शिवसेनेचे अब्दुल सत्तार यांनी त्यांच्या उमेदवारा विरोधात प्रचार केला असा आरोप केला आहे.तर शिवसेनेने भाजपच्या प्रशांत बंब यांच्याकडे बोट दाखवून तो आरोप फेटाळला आहे.मित्र पक्षांनी एकमेकांना सहकार्य करण्याऐवजी स्वतंत्र अस्तित्व दाखवण्याची स्पर्धा का करावी?.... कारण प्रत्येक पक्षाची पुढील वाटचाल स्थानिक स्वराज्य संस्था,आणि विधानसभेवर आहे. सत्तेतील भागीदारी केवळ खुर्च्यांची वाटणी नसते, त्याला जबाबदाऱ्याचीही असते,या सगळ्यात शिवसेनेचे पुणे शहर प्रमुख रवींद्र धंगेकर यांनी तर कमालच केली, त्यांनी थेट भाजपच्या स्मिता जाधव यांना मतदान करू नका, असे उघड आवाहन पदवीधर मतदारांना केले, तितक्यावरच ते थांबले नाहीत तर जाधव यांच्या पराभवानंतर "शाब्बास पदवीधरांनो "अशी जाहीर शाबासकी देत भाजपच्या जखमेवर चांगलेच मीठ चोळले. आपल्या पक्षाच्या पदाधिकाकडून होणाऱ्या या आगळीकीबाबत एकनाथ शिंदे हे मौन बाळगून असल्याने भाजपची खूपच चिडचिड झाली आहे. विरोधकांना या सगळ्याचा राजकीय फायदा होतो, हे उघड आहे. संजय राऊत यांनी शून्य वरून टोला लगावला, रोहित पवारांनी मुख्यमंत्र्यांनी नागपुरात बंडखोरांच्या घरी जाऊन मनधरणी करूनही भाजपचा पराभव झाल्याची चेष्टा केली. ठाकरे गटाला एकही जागा मिळाली नाही, अमरावतीत त्यांनी कॉंग्रेस विरोधात अपक्षाला पाठिंबा दिला,आणि महाविकास आघाडीत समन्वय नव्हता, हे त्यांच्या प्रदेशाध्यक्ष अध्यक्षांनीच कबूल केले म्हणजे हा विरोधकाचा विजय नाही, सत्ताधाऱ्यांचा हा स्वतःचाच पराभव आहे. पुढील काळातील समीकरणाचा हिशोब या निकालाने बदलण्याची शक्यता आहे. शरद पवार गटाने पुणे, आणि मराठवाड्यात जागा जिंकल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ते आपली ताकद पुन्हा सिद्ध करून दाखवण्याचा प्रयत्न करतील, दुसरीकडे महायुतीला हे दाखवायचे आहे की तिची एकजूट केवळ सत्तेच्या गणिता पुरती मर्यादित नाही. विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये जागा वाटपाचा प्रत्येक वाद याच पद्धतीने फुटण्याचा धोका आहे. D तो आत्ताच रोखला तरच पुढील लढती सोप्या होतील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोरच्या आव्हान दुहेरी आहे. एकीकडे नागपूरला सारख्या पालिकेतील पराभव पचवताना संघटनेतील आत्मविश्वास टिकवायचा आहे. दुसरीकडे दोन मित्र पक्षाना व त्यांच्या नेत्यांना एका टेबलावर बसवून पुढील जागा वाटपाचा सूत्रबद्ध नकाशा तयार करायचा आहे. ते काम एका आदेशाने होणार नाही विश्वासाने होईल. नागपूरची मोजणी सुरू असताना सोशल मीडियावर केलेली टिपणी मुख्यमंत्र्यांना मागे घ्यावी लागली.हा पण संयमाचा धडा आहे. नेतृत्वाची खरी परीक्षा जिंकणार नाही तर पराभवा नंतरच्या वर्तनात असते. महायुतीतीला आज विरोधकांच्या आक्रमणाला उत्तर देण्याची नाही, तर आपल्या घटक पक्षातील मतभेद विरघळवण्याची कसोटी आहे. मूलभूत प्रश्न एकच आहे, महायुती खुर्च्यांच्या वाटणीपलीकडे जाऊन मताची वाटणी करू शकते का? ती शक्य झाली तर हे तीन पराभव पुढील विजयाची पायाभरणी ठरतील. अन्यथा विरोधकांना काहीच करावे लागणार नाही. महायुती स्वतःचा पराभव करत राहील. नुकत्याच झालेल्या पदवीधर मतदार संघातील निकालानंतर असे सिद्ध होऊ लागले की भाजपची संघटनात्मक पिछेहाट मोठ्या प्रमाणावर झालेली दिसत आहे. जनसंघ, आणि भारतीय जनता पक्षाचे राजकीय प्रवासात नागपूर. पुणे. मुंबई. कोकण. आणि छत्रपती संभाजी नगर यासारखे पदवीधर मतदार संघ पक्षाचे घट्ट न घडणारे कायमस्वरूपी मतदारसंघ म्हणून सुपरीचीत होते. नागपूर पदवीधर मतदारसंघातून यापूर्वी रामजीवन चौधरी, गंगाधरराव फडणवीस,नितीन गडकरी, यांनी तर पुण्यातून नारायणराव वैद्य, प्रकाशराव जावडेकर,चंद्रकांत पाटील, यांनी अनेक दशके प्रतिनिधित्व केलेले आहे. पण गेल्या काही कालावधीपासून या दोन्ही ठिकाणाहून भारतीय जनता पक्षाला कायम अपयश येतअसल्याचे दिसत आहे. या मागे पक्षाची संघटनात्मक पिछेहाट होत असल्याचे दिसत आहे. पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीत दर सहा वर्षांनी नवीन मतदार नोंदणी करावी लागते. एकेकाळी घरोघरी, महाविद्यालयात, आणि कार्यालयात, जाऊन मतदार नोंदणी करणारी भाजपची यंत्रणा अलीकडे सुस्तावलेली आहे. दुसरीकडे विरोधी पक्षाने नियोजनबद्ध रित्या मतदान नोंदणी करून आपली मतपेढी तयार केली. स्थानिक पातळीवरून संपर्क तुटणे, हेही अपयशाचे कारण आहे.खाजगी संस्थेतील उच्च पेन्शन योजनेपासून वंचित राहिलेले पेन्शनर,जुनी पेन्शन योजना, बेरोजगारी,कंत्राटी भरती, प्राध्यापक शिक्षक शिक्षकेतरांचे प्रश्न, आणि महागाई, यासारख्या मुद्द्यावर पदवीधर मतदार संवेदनशील असतो. मात्र भाजपचे कार्यकर्ते या वर्गापर्यंत पोहोचण्यात अपयशी ठरले. मतदानाच्या दिवशी मतदाराला केंद्रापर्यंत आणण्याची यंत्रणा प्रभावी ठरली नाही. नागपूर, आणि पुण्यातील पराभव ही संघटनात्मक अकार्यक्षम मतदार नोंदणीतीर कुचराई,आणि सुशिक्षित मतदारांशी तुटलेल्या संपर्काचा परिणाम आहे.सत्ताधारी भारतीय जनता पक्षासाठी आणि त्यांच्या आत्मपरीक्षणाचा इशारा आहे.

झेडपीच्या शाळा 'नासा'च्या वाटेवर! पुण्याचे 'मॉडेल स्कूल' राज्याला दिशा देणार

■ पुरंदर (दै. संध्या)

एकेकाळी ओस पडत चाललेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये आता रोबोटिक्सचे धडे गिरवले जात असून, ग्रामीण विद्यार्थी थेट नासा-इस्रोची स्वप्ने पाहू लागले आहेत. पुणे जिल्हा परिषदेच्या 'मॉडेल स्कूल' प्रकल्पाची दखल राज्य पातळीवर घेतली गेली असून, प्राथमिक शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल यांनी गुरुवारी (दि. ३० ऑक्टोबर) शाळांना भेट देऊन या उपक्रमाचे तोंडभरून कौतुक केले आणि 'समूह शाळां'चा हा प्रयोग राज्यासाठी दिशादर्शक ठरावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.



हवेलीतील लोणीकंद, तसेच पुरंदरमधील खानवडी आणि सोनोरी येथील शाळांमध्ये त्यांनी डिजिटल वर्गखोल्या, तंत्रज्ञानाधारित अध्यापन आणि रोबोटिक्स, स्टेम, एआर-व्हीआर, अटल टिंकरिंग प्रयोगशाळांची पाहणी केली. विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत अध्ययन पातळी तपासताना वाढती पटसंख्या आणि मुलांचा आत्मविश्वास पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले, तर विद्यार्थ्यांना नासा, युरोपियन अंतराळ केंद्र आणि इस्रोच्या अभ्यासदौऱ्यावर पाठविण्याच्या उपक्रमालाही खास दाद दिली.

या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, शिक्षणाधिकारी ललिता दहितुले, भाऊसाहेब कारेकर, सभापती अमिल झेंडे, उपशिक्षणाधिकारी आस्मा मोमीन, गटशिक्षणाधिकारी बामणे व खाडे उपस्थित होते.

> ग्रामीण मुलांना दर्जेदार शिक्षणाची समान संधी देणे हेच आमचे ध्येय आहे. वाढती पटसंख्या हीच मॉडेल स्कूलची खरी पावती आहे.
> - विरधवल जगदाळे, अध्यक्ष, जिल्हा परिषद

> मुलांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांच्यातील कौशल्य आणि संशोधनवृत्तीला वाव देण्यासाठीच आधुनिक प्रयोगशाळा आणि अंतराळ संस्थांचे दौरे राबवत आहोत.
> - विवेक वळसे पाटील, उपाध्यक्ष, जिल्हा परिषद

> समूह शाळांच्या माध्यमातून मनुष्यबळ व संसाधनांचा प्रभावी वापर करून दर्जेदार शिक्षणाचे आदर्श प्रारूप उभारण्याचे आमचे नियोजन आहे.
> - गजानन पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर ॲडव्हांटा १४०० बियाण्याच्या विक्रीवर बंदी

■ नारायणगाव(दै. संध्या)

फुलकोबीच्या ॲडव्हांटा १४०० या वाणाच्या बियाण्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर जुन्नर तालुका कृषी विभागाने या बियाण्याच्या विक्रीवर बंदी घातली आहे. त्यामुळे तालुक्यातील सर्व परवानाधारक बियाणे विक्रेत्यांना संबंधित वाणाची विक्री तात्काळ थांबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याबाबत कृषी विभागाचे गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक ज्योतीराम जाधव यांनी माहिती दिली.

ॲडव्हांटा १४०० या फुलकोबीच्या वाणाची लागवड केल्यानंतर अपेक्षित उत्पादन मिळत नसल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे केल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत तालुका तक्रार निवारण समितीने पाहणी करून अहवाल सादर केला. संबंधित वाण हवामानातील बदलांबाबत संवेदनशील असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

खोडद येथील शेतकरी अविनाश गाडेकर यांनी ॲडव्हांटा १४०० या वाणाची रोपे खरेदी करून शेतात लागवड केली होती. मात्र, लागवडीनंतर पिकाला अपेक्षित फळधारणा न झाल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. या प्रकरणाची गंभीर दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने बियाणे अधिनियम १९६६ मधील कलम १४ (१) (क) नुसार २७ ऑक्टोबर २०२६ रोजी संबंधित बियाण्याच्या विक्रीवर बंदी घालण्याचा आदेश जारी केला आहे. या आदेशानुसार ॲडव्हांटा एंटरप्रायझेस प्रा. लि. कंपनीने उत्पादित केलेल्या ॲडव्हांटा १४०० या फुलकोबी वाणाची जुन्नर तालुक्यातील कोणत्याही परवानाधारक विक्रेत्याने विक्री करू नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

संचालिका नीता शेवकरी यांना सन्मान नारीशक्ती गौरव पुरस्कार

■ चाकण (दै. संध्या)

कला, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या येथील आर्ट वर्ल्ड ड्रॉइंग क्लासेस अँड इव्हेंट मॅनेजमेंटच्या संचालिका नीता सुशील शेवकरी (बारवकर) यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने सन्मान नारी शक्ती गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.



येथे आयोजित करण्यात आलेल्या एका भरगच्च सन्मान सोहळ्यात शेवकरी यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. नीता शेवकरी यांनी कला आणि शिक्षण क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. त्यांनी २०१२ मध्ये कमर्शियल आर्ट, २०१३ मध्ये टीचर ट्रेनिंग कोर्स, २०१९ मध्ये आर्ट टीचर डिप्लोमा तसेच आर्ट मास्टरचे शिक्षण पूर्ण केले. चित्रकला क्षेत्रात दहा, तर शिक्षण क्षेत्रात १४ वर्षांचा अध्यापनाचा प्रदीर्घ अनुभव आहे. विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, कलात्मक दृष्टिकोन आणि पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी त्या सातत्याने प्रयत्नशील असतात. कला आणि पर्यावरण संवर्धनाला विशेष महत्त्व आहे. शाळा व सोसायट्यांमध्ये पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याच्या मोफत कार्यशाळा घेऊन पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्याबरोबरच विविध स्पर्धांमध्ये मोफत मार्गदर्शन आणि परीक्षणाच्या माध्यमातून त्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत आहेत.

कलाविष्कार मंच व वसुंधरा बहुउद्देशीय संस्था या सामाजिक संस्थांच्या माध्यमातूनही त्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतात. कला, शिक्षण आणि समाजसेवा यांची सांगड घालत त्यांनी चाकण परिसरात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत यापूर्वीही त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. नीता शेवकरी यांच्या कलात्मक, शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा गौरव झाल्याने चाकण परिसरातून त्यांच्यावर कौतुकांचा वर्षाव होत आहे.

श्री काळभैरवनाथ, भैरवनाथ व माता जोगेश्वरी मंदिरात गंधाची आकर्षक उटी

■ सासवड (दै. संध्या)

नवरात्रोत्सवाच्या काळात देवांना उष्णतेमुळे झालेला दाह कमी व्हावा, यासाठी विजयादशमी झाल्यानंतर अश्विन महिन्यात येणाऱ्या तीन शनिवारी सासवडचे ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ, श्री भैरवनाथ आणि माता जोगेश्वरी यांना विड्याच्या पानाची, गंधाची व चंदनाची उटी लावण्याची परंपरा पूर्वीपासून चालत आली आहे. या प्रथेनुसार आज दुसऱ्या शनिवारी (ता. ३१) शुद्ध चंदन उगळून देवांच्या मूर्तींना सुवासिक गंधाची उटी लावण्यात आली. विशेष म्हणजे, या चंदनाच्या लेपातून श्रींच्या मूर्तींवर श्रीराम, लक्ष्मण, सीता आणि हनुमान यांच्या अतिशय देखण्या आणि भावूक प्रतिकृती साकारण्यात आल्या.



देवस्थान ट्रस्टच्या वतीने ही खास गंधाची उटी लावण्यात आली असून, देवस्थानचे पुजारी राजेंद्र भैरवकर, मोहन भैरवकर, गणेश भैरवकर आणि रामचंद्र भैरवकर या मानकरी मंडळींनी विधीवत ही सेवा पार पाडली.

या धार्मिक सोहळ्या प्रसंगी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष रमेश जगताप, उपाध्यक्ष पांडुरंग भोंगळे, चैत्री उत्सव समितीचे अध्यक्ष अजय जगताप, उपाध्यक्ष नितीन भोंगळे, तसेच रामभाऊ इनामके, विलास जगताप, रवींद्रपंत जगताप, वैभव जगताप आणि ऋषीकेश जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

या धार्मिक परंपरेनिमित्त मंदिरात भाविकांसाठी सचिन विनायक जगताप यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांनंतर रात्री पारंपरिक वाद्यांच्या गजरात देवाच्या छबिन्याचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

चाकण शॉपिंग फेस्टिवल व दिवाळी मेळाव्याला प्रतिसाद

■ चाकण (दै. संध्या)

येथील स्वामिनी महिला बहुउद्देशीय संस्था, यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'चाकण शॉपिंग फेस्टिव्हल व दिवाळी मेळाव्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला.



महिला उद्योजिकांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. महिलांमध्ये अनेक कला, कौशल्ये आणि उद्योजकतेची क्षमता असते. मात्र, अनेकदा आर्थिक मर्यादा आणि योग्य बाजारपेठेचा अभाव यामुळे त्यांच्या कौशल्यांना अपेक्षित संधी मिळत नाही. हीच बाब लक्षात घेऊन स्वामिनी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने शुभांगी आगरकर यांनी महिलांना व्यवसायासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

चाकण येथील या मेळाव्यात सहभागी झालेल्या नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे खरेदीच्या आनंदासोबतच आरोग्याची काळजी घेण्याची संधीही नागरिकांना मिळाली. स्वामिनी महिला बहुउद्देशीय संस्था केवळ चाकणपुरती मर्यादित न राहता विविध ठिकाणी महिलांच्या सक्षमीकरणासाठी, रोजगारनिर्मितीसाठी आणि महिलांना एकत्र आणून त्यांच्यातील कौशल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.

'मी कसा झालो' हिंदीत नेणाऱ्या लेखणीचा अत्रेंच्या नावाने सन्मान!

■ पुरंदर (दै. संध्या)

आचार्य अत्रे 'कसे झाले' हे मराठी वाचकांना अत्रेंनीच सांगितले, आता तीच कहाणी हिंदी वाचकांपर्यंत नेण्याचे काम करणारे सासवडचे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुभाष तळेकर यांना अत्रेंच्याच नावाचा मानाचा पुरस्कार मिळाला आहे.

मनोहारी मैत्री संघाच्या 'मातृभूमी सेवा पुरस्कार' उपक्रमांतर्गत आचार्य प्र. के. अत्रे पुरस्कार देऊन त्यांना महाराष्ट्र साहित्य परिषदेत गौरविण्यात आले. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस, रंगत-संगत प्रतिष्ठानचे प्रमोद आडकर आणि समाजमित्र मनोहर कोलते या मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा रंगला. अत्रेंच्या 'मी कसा झालो' या गाजलेल्या आत्मकथनाच्या संक्षिप्त आवृत्तीचा हिंदी अनुवाद सध्या डॉ. तळेकर करत आहेत. मात्र अत्रेंशी त्यांचे नाते यापेक्षाही जुने आणि खोल आहे. अत्रेंचे जन्मगाव असलेल्या कोडीत खुर्दमध्येच त्यांचाही जन्म झाला आणि अत्रेंप्रमाणेच त्यांचेही बालपण कऱ्हा नदीकाठच्या सासवडमध्ये गेले. या मातीचे ऋण त्यांनी लेखणीतून फेडले.

मराठीतील त्यांच्या ६ प्रकाशित पुस्तकांमध्ये 'ज्ञात-अज्ञात अत्रे' आणि 'रायटर अँड फायटर ऑफ महाराष्ट्र' ही अत्रेंवरील दोन महत्त्वाची पुस्तके आहेत. सासवडमधील आचार्य अत्रे वाचन कट्ट्याच्या माध्यमातून ते अत्रेंच्या साहित्याचा जागर करत असतात, तर आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानमध्ये सहसचिव म्हणून त्यांनी संघटनात्मक जबाबदारीही पार पाडली आहे. या साऱ्या योगायोगांचा उल्लेख करत डॉ. तळेकर म्हणाले, "मातृभूमी सेवा पुरस्कार हा माझ्या लेखी मातृभाषा मराठीच्या सेवेचा पुरस्कार आहे. ज्या अत्रेंच्या सहवासात माझे लेखन घडले, त्यांच्याच नावाचा सन्मान मिळणे हा माझ्यासाठी कृतार्थतेचा आणि कृतज्ञतेचा क्षण आहे." कार्यक्रमात इतर मान्यवरांचाही विविध पुरस्कारांनी गौरव झाला. लालासाहेब मोहिते केशवराव जेधे पुरस्काराचे, ॲड. मारुती गोळे छत्रपती व्यंकोजीराजे भोसले पुरस्काराचे, डॉ. अरविंद नेरकर हैबतराव आरफळकर पुरस्काराचे, कैलास दुधाळे मदर तेरेसा पुरस्काराचे, तर डॉ. गजेंद्र देशपांडे डॉ. आनंदीबाई जोशी पुरस्काराचे मानकरी ठरले.



RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



पुण्यात एचसीएल ग्रुपचा ५० वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

पुणे : दैनिक संध्या

एचसीएल ग्रुपने आपल्या ५० वर्षांच्या प्रवासाचा सुवर्णमहोत्सव साजरा करत ३१ ऑक्टोबर रोजी पुण्यात कर्मचाऱ्यांसाठी विशेष संगीत मैफिलीचे आयोजन केले होते, ज्यामध्ये प्रख्यात गायक आणि संगीतकार पापोन यांनी सादरीकरण केले. बालेवाडी स्टेडियमवर आयोजित या मैफिलीत एचसीएल ग्रुप आणि शिव नाडर फाउंडेशनचे ४,००० हून अधिक कर्मचारी संगीत आणि उत्साहाच्या या सायंकाळी एकत्र आले होते. या मैफिलीला एचसीएल ग्रुप आणि एचसीएलटेकच्या चेअरपर्सन रोशनी नाडर मल्होत्रा, तसेच एचसीएलटेकच्या कॉर्पोरेट फंक्शन्सचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर राहुल सिंग उपस्थित होते. त्यांनी पुण्यातील कर्मचाऱ्यांसोबत ग्रुपचा सुवर्णमहोत्सव साजरा केला. पापोन यांनी मंचावर आपल्या अत्यंत लोकप्रिय गाण्यांचे सादरीकरण केले, ज्यावर कर्मचाऱ्यांनी सायंकाळभर गात आणि थिरकत मनसोक्त आनंद लुटला. एचसीएल ग्रुपच्या ५० व्या वर्षानिमित्त आयोजित विशेष कॉन्सर्ट मालिकेचा भाग म्हणून यापूर्वी नोएडा, लखनौ, चेन्नई, विजयवाडा, मदुराई आणि हैदराबाद येथे झालेल्या अशाच कार्यक्रमांनंतर पुण्यात ही मैफिल पार पडली. एचसीएलने ११ ऑगस्ट रोजी आपला अधिकृत ५० वा वर्धापन दिन साजरा केला असला, तरी विविध शहरांमध्ये हे सेलिब्रेशन सुरूच आहे, ज्याने गेल्या पाच दशकांत कंपनीला घडवणारे कर्मचारी आणि या सामायिक प्रवासाचा सन्मान करण्यासाठी सर्वांना एकत्र आणले आहे. एचसीएल ग्रुपच्या विशेष ५० व्या वर्धापन दिनी कॉन्सर्ट मालिकेतील ही सातवी मैफिल होती, जिथे ग्रुपच्या पाच दशकांच्या प्रवासाचा आनंद विविध ठिकाणी अशाच उत्साहात पुढेही साजरा केला जात आहे.

युवा पिढीतील उद्यमशीलतेमधूनच विकसित भारताचे स्वप्न साकार होईल : सुनील फुलारी

पुणे : दैनिक संध्या

"पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे ध्येय गाठायचे असेल, तर इनोव्हेशन, स्टार्टअप आणि उद्योग वाढायला हवेत. युवा पिढीने रोजगारनिर्मिती आणि उद्यमशीलतेला प्राधान्य द्यावे. त्यातूनच २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न साकार होणार आहे. 'कारोबार ९.०'सारख्या उपक्रमांतून विद्यार्थ्यांना उद्योजकतेचे धडे मिळत आहेत," असे प्रतिपादन विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी केले. विद्यार्थ्यांमध्ये उद्यमशीलता, आत्मविश्वास व रोजगारनिर्मितीची मानसिकता विकसित करण्यावर 'सूर्यदत्त' संस्थेचा नेहमीच भर राहिलेला आहे, असे सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी सांगितले. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकीय दृष्टिकोन, व्यावसायिक कौशल्ये, व्यवस्थापन क्षमता आणि बाजारपेठेची समज विकसित करण्याच्या उद्देशाने सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड मास कम्युनिकेशन (एसआयएमएमसी) आणि सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी (एसआयबीएमटी) यांच्या वतीने आयोजित 'कारोबार ९.० - सूर्यभारत जननेक्स्ट स्टार्टअप फेस्ट'मध्ये प्रमुख पाहुणे सुनील फुलारी बोलत होते. 'सूर्यदत्त'च्या बावधन कॅम्पसमध्ये झालेल्या कार्यक्रमावेळी पुणे इंटरनॅशनल सेंटरचे उपसंचालक हृषीकेश धांडे, 'सूर्यदत्त'चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्षा व सचिव सुषमा चोरडिया, अधिष्ठाता प्रा. डॉ. प्रतीक्षा वाबळे, मुख्य कार्यकारी अधिकारी अक्षित कुशल आदी उपस्थित होते. प्रसंगी फुलारी यांना पोलीस सेवेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. 'सूर्यदत्त'चा स्कार्फ, सन्मानचिन्ह, सुवर्णपदक, पुणेरी पगडी असे या पुरस्काराचे स्वरूप होते.



शेतकऱ्यांनो, खचून जाऊ नका, धीर सोडू नका!

जय गणेश व्यासपीठाच्या पुढाकारातून दुष्काळग्रस्त बीड जिल्ह्यातील शेतकरी कुटुंबांना दिवाळीचा आनंद; धान्य, किराणा, फराळ व आकाशकंदील भेट

■ पुणे (दै. संध्या)

संकटं कितीही मोठी असली, तरी आपला लढा त्याहून मोठा आहे. दुष्काळाचे संकट तात्पुरते आहे; मात्र शेतकऱ्यांची मातीशी असलेली नाळ, कष्ट करण्याची वृत्ती आणि जिद्द कायम आहे. या कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांनी खचून न जाता धीराने उभे राहावे. या संघर्षात जय गणेश व्यास पीठाचे कार्यकर्ते आपल्या सोबत आहेत, असा विश्वास पीयूष शाह यांनी शेतमजुरांना दिला. दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद फुलविण्याच्या सामाजिक भावनेतून जय गणेश व्यासपीठ, पुणे शहरातील पाच गणेश मंडळे आणि सहकाऱ्यांच्या पुढाकाराने बीड मधील धुमेगाव येथील जय हनुमान देवस्थान परिसरात विशेष सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत आडपिंपरी व धुमेगाव येथील ४१ गरजू शेतकरी व शेत मजूर कुटुंबांना धान्य, किराणा साहित्य, दिवाळीचा फराळ आणि आकाशकंदील भेट देण्यात आले. संकटाच्या काळात या कुटुंबांना आधार देत त्यांच्या घरातही दिवाळीचा आनंद पोहोचविण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात आला. यावेळी जय गणेश व्यासपीठाच्या माध्यमातून पुढाकार घेणाऱ्या मंडळांमध्ये साईनाथ मंडळ ट्रस्ट, श्री शिवाजी मित्र मंडळ, एकता मित्र मंडळ, तावरे कॉलनी, सत्यवीर मित्र मंडळाचे (शिवदर्शन), नवज्योत मित्र मंडळ, येरवडा, पीयूष शाह, प्रल्हाद भाऊ थोरात, तेजस हिरणवाळे, सुधीर ढमाले, उमेश वैद्य आणि अमित जाधव यांचा सहभाग होता. तसेच मराठा साम्राज्य सेना संस्थापक अध्यक्ष संग्राम ढोले पाटील, विठ्ठल घोडके, महेश घोडके, सुमित अन्नदाते आदी गावकरी मान्यवर यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन पीयूष शाह, सुधीर ढमाले प्रल्हाद भाऊ थोरात, कुमार आणवेकर, अमित जाधव, उमेश वैद्य यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उमेश वैद्य यांनी केले, तर भाऊ थोरात यांनी आभार मानले.



"सण केवळ आपल्या घरात साजरा करून आनंद मिळत नाही, तर संकटात असलेल्या दुसऱ्याच्या घरातही आनंदाचा दिवा लावता आला पाहिजे. शेतकरी हा आपल्या समाजाचा कणा आहे. त्याच्या अडचणीच्या काळात त्याच्या पाठीशी उभे राहणे हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे," अशा भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. जय गणेश व्यासपीठ आणि सहभागी गणेश मंडळांच्या या उपक्रमातून सामाजिक एकोपा, माणुसकी आणि गणेशोत्सवाच्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडते.

सिंबायोसिस विद्यापीठ रुग्णालय आणि संशोधन केंद्राला डायलिसिस मशिन्सची भेट



■ पुणे (दै. संध्या)

सिंबायोसिस विद्यापीठ रुग्णालय आणि संशोधन केंद्र (SUHRC) आणि सिंबायोसिस महिला वैद्यकीय महाविद्यालय (SMCW) यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यरत आरोग्यसेवा उपक्रमाला रोटरी चेन्नई लेजेंड्स, रोटरी मद्रास आणि होडेक लिमिटेड यांच्या वतीने सात डायलिसिस मशीन्स देणगीस्वरूपात प्राप्त झाल्या आहेत. पुण्यातील सिंबायोसिस इंटरनॅशनल (डीम्ड युनिव्हर्सिटी) च्या लवळे परिसरातील रुग्णालयाच्या डायलिसिस केंद्रात या मशीन्स औपचारिकरीत्या सुपूर्द करण्यात आल्या. या उपक्रमामुळे आवश्यक मूत्रपिंड उपचारसेवा अधिक सक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. या सात नवीन मशीन्सच्या समावेशामुळे सिंबायोसिस विद्यापीठ रुग्णालय आणि संशोधन केंद्र (SUHRC) मधील डायलिसिस मशीन्सची एकूण संख्या 32 झाली आहे. त्यामुळे नियमित डायलिसिसची आवश्यकता असलेल्या रुग्णांना सेवा देण्याची रुग्णालयाची क्षमता वाढणार आहे. आरोग्यसेवेच्या पायाभूत सुविधा बळकट करणे आणि रुग्णांना जीवनावश्यक विशेष उपचार अधिक सुलभतेने उपलब्ध करून देणे, या संस्थेच्या बांधिलकीला या देणगीतून बळ मिळाले आहे. मूत्रपिंड निकामी झालेल्या रुग्णांसाठी डायलिसिस हा नियमितपणे करावा लागणारा अत्यंत महत्त्वाचा उपचार आहे. त्यामुळे सातत्यपूर्ण आणि विश्वासार्ह डायलिसिस सेवा उपलब्ध असणे आवश्यक ठरते. सिंबायोसिस विद्यापीठ रुग्णालय आणि संशोधन केंद्र (SUHRC) चे डायलिसिस केंद्र आठवड्याचे सातही दिवस, चोवीस तास कार्यरत असते. या केंद्रात दररोज सुमारे ७० ते ९० डायलिसिस सत्रे घेतली जातात, तर दर महिन्याला सुमारे २,००० डायलिसिस सत्रे पार पडतात.

'काऊ फॉर किड्स' पुस्तकाचे प्रकाशन

■ पुणे (दै. संध्या)

वसुबारसेनिमित्त कोंढवा येथील इस्कॉन एनव्हीसीसी मंदिरात गोपूजन, श्रीकृष्ण दर्शन, पुस्तक प्रकाशन आणि नव्या पिढीशी संवाद अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारी, दि. ५ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात डॉ. भूषण पटवर्धन लिखित 'काऊ फॉर किड्स' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. गोमातेचे महत्त्व, गोसंवर्धन, पर्यावरण, संस्कृती आणि जीवनमूल्ये या विषयांवर यावेळी संवाद साधला जाणार आहे. तसेच 'संस्कार ते संकल्प' या संकल्पनेतून नव्या पिढीशी प्रेरणादायी संवाद आयोजित करण्यात आला आहे. शिक्षण, आरोग्य, कला आणि उद्योग क्षेत्रातील मान्यवर या संवादात सहभागी होणार आहेत. कार्यक्रमाची सुरुवात गोमाता पूजन आणि मंदिर दर्शनाने होईल. त्यानंतर पुस्तक प्रकाशन, गोमातेचे महत्त्व या विषयावर संवाद, नव्या पिढीशी संस्कार ते संकल्प या विषयावर चर्चा होणार आहे. कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील मान्यवर सहभागी होणार आहेत.

यामध्ये डॉ. एस. बी. मुजुमदार यांची नात अमृता (येरवडेकर) रुईकर, प्रवीण मसालेचे राजकुमार चोरडिया यांचे पुत्र आनंद चोरडिया, चितळे बंधूचे राजाभाऊ चितळे यांचे नातू इंद्रनील चितळे, संतूर वादक धनंजय दैठणकर यांचे पुत्र निनाद दैठणकर, डॉ. जी. आर. एकबोटे यांची कन्या निवेदिता एकबोटे, भारती विद्यापीठाचे डॉ. शिवाजीराव कदम यांचे पुत्र राहुल कदम, डॉ. सुरेशचंद्र भोसले यांचे पुत्र चिन्मय भोसले, चाणक्य मंडळाचे डॉ. अविनाश धर्माधिकारी यांचे पुत्र सिद्धार्थ धर्माधिकारी, भारतीय संस्कृती दर्शन ट्रस्टचे डॉ. एस. पी. सरदेशमुख यांचे पुत्र सुकुमार सरदेशमुख आणि पर्पल मोबिलिटी सोल्युशन्सचे प्रसन्न पटवर्धन यांचे पुत्र सौरभ पटवर्धन उपस्थित राहणार आहेत.

फ्लाइंग फ्लीची पुण्यात एंट्री

■ पुणे (दै. संध्या)

फ्लाईंग फ्ली या रॉयल एनफिल्डच्या सिटी+ इलेक्ट्रिक मोबिलिटी ब्रँडने भारतात आपला विस्तार आणखी वाढवला आहे. या ब्रँडचे स्वागत करणारे पुणे देशातील तिसरे शहर ठरले आहे. बेंगळुरू आणि हैदराबादमधील ग्राहकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर, जिथे वाहनधारकांनी आधीच १.२५ लाख किलोमीटरहून अधिक अंतर पार केले आहे, फ्लाईंग फ्लीने आता पुण्यात १० विक्री व सेवा केंद्रे (सेल्स अँड सर्व्हिस सेंटर्स) सुरू केली आहेत. मोक्याच्या ठिकाणी असलेल्या या केंद्रांमुळे ग्राहकांना एफएफ. सी६ पाहणे, अनुभव घेणे आणि खरेदी करणे अधिक सोयीचे होणार आहे. बेंगळुरूमधील १२ आणि हैदराबादमधील ४ सेल्स अँड सर्व्हिस सेंटर्सच्या पाठोपाठ झालेला हा विस्तार फ्लाईंग फ्लीचा प्रबळ रिटेल आणि ग्राहक सेवा परिसंस्था उभारण्यावरील सातत्यपूर्ण भर दर्शवतो, ज्याद्वारे कंपनी ज्या शहरात प्रवेश करते, तेथील महत्त्वाच्या ठिकाणी सुलभ उपलब्धता आणि विक्रीपश्चात सेवा दृढ करण्यावर भर देते. या नेटवर्कला फ्लाईंग फ्लीच्या हब-अँड-स्पोक ग्राहक सेवा परिसंस्थेचा पाठिंबा लाभला आहे, तसेच हे नेटवर्क कार्यक्षम आणि विश्वासार्ह सेवा देण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे. पुण्यातील प्रत्येक डीलर सेल्स अँड सर्व्हिस सेंटरमध्ये विशेष टेक्निकल साहाय्य, तसेच नियमित सेवा व देखभाल पुरवण्यासाठी सज्ज आहे. या मोटरसायकलची किंमत २.७९ लाख रुपये (एक्स-शोरूम) आणि बॅटरी-ॲज-अ-सर्व्हिस पर्यायांतर्गत १.९९ लाख रुपये आहे. अधिक माहितीसाठी flyingflea.com ला भेट द्या किंवा पुण्यातील फ्लाईंग फ्ली केंद्रांवर जाऊन फ्लाईंग फ्ली सी६ चा प्रत्यक्ष अनुभव घ्या.



डिजिटल फसवणूक टाळा पुणे पोलिसांचे नागरिकांना आवाहन

■ पुणे (दै. संध्या)



देशभरात सायबर फसवणूक आणि डिजिटल आर्थिक गैरव्यवहार यांच्या घटना वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर, 'बजाज फिनसर्व्ह'चा भाग असलेल्या 'बजाज फायनान्स लिमिटेड'ने (बीएफएल) पुण्यातील पर्वती येथील 'यशवंतराव चव्हाण लॉ कॉलेज'मध्ये 'नॉकआउट डिजिटल फ्रॉड' यासंबंधीची जनजागृती मोहीम राबवली. लोकांमध्ये आर्थिक व्यवहारांबाबत आणि सायबर सुरक्षेबाबत जागरूकता वाढवण्याच्या प्रयत्नांचा हा एक भाग होता. बजाज फायनान्स ही भारतातील खासगी क्षेत्रातील सर्वांत मोठी बँकेतर वित्तीय कंपनी (एनबीएफसी) आहे. या उपक्रमात 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया'च्या (आरबीआय) फसवणूक जोखीम व्यवस्थापनविषयक मार्गदर्शक तत्त्वांनुसार माहिती देण्यात आली. फिशिंग, ट्रेडिंग ॲप्स, एपीके फाइल्स, नोकरी आणि व्हिसाच्या नावाखाली होणारी फसवणूक, पार्टटाइम नोकरीची आमिषे, ओटीपीच्या माध्यमातून होणारी फसवणूक, बनावट कर्जाच्या ऑफर्स, गुंतवणुकीच्या नावाखाली होणारे घोटाळे, 'डिजिटल अरेस्ट'च्या नावाखाली होणारी फसवणूक, तसेच सोशल मीडिया आणि मेसेजिंग ॲप्सवरून पाठवल्या जाणाऱ्या बनावट लिंक्स यांसारख्या सायबर धोक्यांबाबत लोकांना माहिती यावेळी देण्यात आली. वैयक्तिक माहिती आणि बँक खात्याशी संबंधित तपशील सुरक्षित ठेवण्याचे महत्त्व तज्ज्ञांनी सांगितले. तसेच, ऑनलाइन आर्थिक व्यवहार करताना नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन केले. बजाज फायनान्सच्या या 'नॉकआउट डिजिटल फ्रॉड' या जनजागृती उपक्रमात बोलताना पुण्यातील 'पर्वती सायबर सेल'चे सायबर पोलीस अधिकारी प्रसाद पोद्दार यांनी नागरिकांना "क्लिक करण्यापूर्वी विचार करा" असे आवाहन केले. अनोळखी लिंक्स, फोन आणि मेसेज यांची खातरजमा करणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. "सायबर फसवणुकीच्या घटना वाढत आहेत. त्यामुळे डिजिटल प्लॅटफॉर्म वापरताना नागरिकांनी सावध राहिले पाहिजे. वैयक्तिक माहिती निष्काळजीपणे शेअर केल्यास तिचा गैरवापर करून फसवणारे लोक आर्थिक नुकसान करू शकतात. फसवणूक झाल्यानंतरचा पहिला तास अत्यंत महत्त्वाचा असतो. या काळात पीडित व्यक्तीने १९३० या क्रमांकावर फोन करून तक्रार केल्यास गमावलेले पैसे परत मिळण्याची शक्यता ९० टक्के असते.

ग्रामपंचायत चोपडज, ता. बारामती, जि. पुणे

जाहिर निविदा/दर पत्रक सुचना सन २०२६/२७

ग्रामपंचायत चोपडज ता.बारामती जि.पुणे यांचेकडुन योग्य त्या स्थानिक पुरवठादाराकडुन खालील साहित्याची व कामांची निविदा/दरपत्रके मागविणेत येत आहेत. खालील प्रमाणे साहित्य व कामे देण्यात आलेली आहेत.

कामाचे नाव : ग्रामपंचायत चोपडज येथे साहित्य व सेवा पुरवठा करणे.

अ.क्र.	साहित्याचे नाव	परिमाण	सादर करावयाचे दर
1	7.5/18 Hp Laxmi Lada sub motar V6	Nos	
2	63mm Hdpf 10 kg kothari pipe	Ft	
3	4MM service wire	Mtr	
4	63 MM flange	Nos	
5	63MM SS nipple	Nos	
6	Chikat tape	Nos	
7	Nut bolt	Nos	
8	Nylon russi	Kg	
9	Starter	Nos	
10	Mobile auto	Nos	
11	Other fitting	Nos	
12	Labour charges	Nos	

निविदेच्या/दरपत्रक अटी व शर्ती खालील प्रमाणे : १) सदर कामाच्या निविदा/दरपत्रक हि कामाच्या बाब निहाय मागविण्यात येत असून बाब निहाय निविदा /दरपत्रक अंतिम करण्यात येतील. त्या नुसार निविदा /दरपत्रक धारकाने स्वतःचे दर टाकून निविदा/दरपत्रक बंद लिफाफ्यात ग्रामपंचायत कार्यालयात दिनांक ०२/११/२०२६ ते ०९/११/२०२६ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० वा.ते सायंकाळी ६ वा. पर्यंत समक्ष अथवा योग्य त्या अभिकर्त्या मार्फत सादर करावी. २) सदर निविदा दिनांक १२/११/२०२६ रोजी ग्रामपंचायत कार्यालय चोपडज येथे सर्वा समक्ष उघडण्यात येतील. ३) सदरचे साहित्य पुरवठा काम ज्याची बाबा निहाय दरपत्रके / निविदा कमी दराची असेल त्याला मिळतील. ४) साहित्य पुरवठा मुदत ;- ३ महिने राहील. ५) सदर पुरवठा दार GST अंतर्गत नोंदणी कृत असणे आवश्यक आहे. GST नोंदणी प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे. ६) सदर पुरवठादार यांनी सर्व दर GST सह सादर करणे बंधनकारक आहेत.७) सर्व दर साहित्य पोच करण्यासह सादर करणे आवश्यक आहे.वाहतुक खर्च दिला जाणार नाही. सदर निविदा/दरपत्रका बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा/दरपत्रक रद्द करणेचा, कोणतीही निविदा /दरपत्रक स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत चोपडज यांनी राखुन ठेवला आहे.

प्रशासक ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत चोपडज ता. बारामती जि. पुणे

पुण्यात सांधेरोपण शस्त्रक्रियेला रोबोटिक तंत्रज्ञानाची जोड

'हीलिंग बोन्स क्लिनिक'मध्ये अत्याधुनिक 'CORI रोबोटिक सिस्टीम'चे उद्घाटन!

■ पुणे (दै. संध्या)

वैद्यकीय क्षेत्रात सातत्याने होत असलेल्या तांत्रिक प्रगतीमुळे सांधेरोपण शस्त्रक्रिया अधिक अचूक आणि नियोजनबद्ध पद्धतीने करणे शक्य होत आहे. याच पार्श्वभूमीवर पुण्यातील ऑर्थोपेडिक आणि फिजिओथेरपी उपचारांसाठी कार्यरत असलेल्या 'हीलिंग बोन्स क्लिनिक'ने अत्याधुनिक 'स्मिथ अँड नेफ्यू CORI रोबोटिक सिस्टीम' रुग्णसेवेत दाखल केली आहे. या प्रणालीचे औपचारिक उद्घाटन रविवारी (दि. १ नोव्हेंबर) मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. या अत्याधुनिक प्रणालीमुळे दक्षिण पुण्यातील रुग्णांना रोबोटिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सांधेरोपण शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध होणार असून, उपचारांमधील अचूकता आणि वैयक्तिक नियोजनाला अधिक चालना मिळणार आहे. क्लिनिकच्या माहितीनुसार, दक्षिण पुण्यात अशी सुविधा उपलब्ध करून देणारे हे पहिले केंद्र आहे. या उद्घाटन सोहळ्यास पुणे महानगरपालिकेच्या नगरसेविका रंजना (नानी) टिळेकर आणि वृषाली कामठे यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी डॉ. अशोक एच. शहा, डॉ. सिद्धार्थ ए. शहा, डॉ. प्रीती एस. शहा यांच्यासह वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ, आरोग्यसेवा व्यावसायिक, मान्यवर आणि हितचिंतक उपस्थित होते.

सांधेरोपण शस्त्रक्रियेमध्ये हाडांची योग्य तयारी आणि कृत्रिम सांध्याची अचूक बसवणूक अत्यंत महत्त्वाची असते. 'CORI रोबोटिक सिस्टीम' ही शल्यचिकित्सकाच्या नियंत्रणाखाली कार्य करणारी अत्याधुनिक प्रणाली असून, शस्त्रक्रियेदरम्यान प्रत्यक्ष वेळेतील माहिती आणि सविस्तर नियोजनाच्या आधारे डॉक्टरांना निर्णय घेण्यास मदत करते. प्रत्येक रुग्णाच्या शरीररचनेनुसार शस्त्रक्रियेचे नियोजन करणे, हाडांची अचूक तयारी करणे आणि कृत्रिम सांध्याची योग्य स्थिती निश्चित करणे यासाठी हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे सांधेरोपण शस्त्रक्रियेत अधिक वैयक्तिकृत उपचारपद्धती अवलंबण्यास मदत होणार असल्याचे क्लिनिकच्या वतीने सांगण्यात आले. यावेळी बोलताना रोबोटिक जॉइंट रिप्लेसमेंट आणि आर्थ्रोस्कोपी तज्ज्ञ डॉ. सिद्धार्थ ए. शहा म्हणाले, "CORI रोबोटिक सिस्टीमचा समावेश हा सांधेरोपण शस्त्रक्रियेच्या आमच्या उपचारपद्धतीतील एक महत्त्वपूर्ण प्रगत टप्पा आहे. रोबोटिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शस्त्रक्रियेचे अधिक अचूक नियोजन करून ती नियंत्रित पद्धतीने पार पाडणे शक्य होते. आधुनिक तंत्रज्ञान आणि वैद्यकीय कौशल्य यांची सांगड घालून प्रत्येक रुग्णाच्या गरजेनुसार प्रभावी ऑर्थोपेडिक उपचार उपलब्ध करून देणे, हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे." डॉ. अशोक एच. शहा यांनी सांगितले की, "हीलिंग बोन्स क्लिनिकमध्ये रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यावर आमचा नेहमीच भर राहिला आहे. बदलत्या वैद्यकीय तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून उपचारांचा दर्जा उंचावण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. CORI रोबोटिक सिस्टीमचे लोकार्पण हे पुण्यात प्रगत ऑर्थोपेडिक उपचार उपलब्ध करून देण्याच्या आमच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे." फिजिओथेरपी आणि न्यूरोसायन्सेस तज्ज्ञ डॉ. प्रीती एस. शहा म्हणाल्या, "यशस्वी सांधेरोपण उपचार केवळ शस्त्रक्रियेपुरते मर्यादित नसतात. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची शारीरिक हालचाल, पुनर्प्राप्ती आणि पुनर्वसन या बाबीही तितक्याच महत्त्वाच्या असतात. प्रगत शस्त्रक्रिया तंत्रज्ञानासोबत फिजिओथेरपी आणि पुनर्वसन सेवांची सांगड घालून रुग्णांना सर्वसमावेशक उपचार देण्याचा आमचा प्रयत्न आहे." नवीन रोबोटिक प्रणालीच्या समावेशामुळे पुणे आणि परिसरातील रुग्णांना प्रगत सांधेरोपण उपचारांची उपलब्धता वाढणार आहे. विशेषतः दक्षिण पुण्यातील नागरिकांसाठी ही सुविधा महत्त्वपूर्ण ठरणार असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सांधेरोपण शस्त्रक्रियेचे नियोजन आणि अंमलबजावणी अधिक सक्षम होणार असल्याचा विश्वास क्लिनिकच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

दक्षिण पुण्यातील रुग्णांसाठी महत्त्वपूर्ण सुविधा

हीलिंग बोन्स क्लिनिकमध्ये ऑर्थोपेडिक उपचार, सांधेरोपण शस्त्रक्रिया, आर्थ्रोस्कोपी, फिजिओथेरपी आणि पुनर्वसन सेवा उपलब्ध आहेत. डॉ. अशोक शहा, डॉ. सिद्धार्थ शहा आणि डॉ. प्रीती शहा यांच्या नेतृत्वाखाली क्लिनिकमध्ये आधुनिक तंत्रज्ञान आणि वैद्यकीय कौशल्य यांच्या समन्वयातून रुग्णकेंद्रित उपचारांवर भर दिला जात आहे.

पुणे महानगरपालिका

निविदा प्रकिया कक्ष

निविदा जाहिरात - नवीन कामे

विक्री कालावधी दिनांक :-०२/११/२०२६ ते १२/११/२०२६ वेळ : दु. २:०० पर्यंत

स्विकृती कालावधी दिनांक :-०२/११/२०२६ ते १२/११/२०२६ वेळ : दु. २:०० पर्यंत

टेंडर उघडणे दिनांक:-१६/११/२०२६ दु. १२:०० वा.

अ. क्र.	टेंडर क्र.	विभाग	कामाचे नाव	निविदा संच किंमत	टेंडर रक्कम	१% बयाणा रक्कम	कामाची मुदत	निविदा विषयक जबाबदार व्यक्तिचे नाव व दुरध्वनी क्र.
१	PMC/DMC-5/ KASABA/2026/235	भवन	मनपा शाळा क्र 86 बी येथे रंगरंगोटी करणे व विविध दुरूस्ती विषयक कामे करणे	415	420966	4210	6 महीने	अतुल गाडे 9604108408
२	PMC/DMC-5/ KASABA/2026/236	भवन	काशेवाडी म्हसोबा मंदिर येथील शौचालय दुरूस्ती करणे	415	420675	4207	6 महीने	अतुल गाडे 9604108408
३	PMC/DMC-5/ KASABA/2026/237	ड्रेनेज	म्हसोबा मंदिर परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे व काँक्रीट करणे	415	420825	4208	6 महीने	अतुल गाडे 9604108408
४	PMC/DMC-5/ KASABA/2026/238	ड्रेनेज	भगवा चौक परिसरातील दिलीप जाधव यांच्या घराजवळील ड्रेनेज लाईन दुरूस्ती व साफसफाई करणे	415	420909	4209	6 महीने	अतुल गाडे 9604108408
५	PMC/DMC-5/ KASABA/2026/239	ड्रेनेज	प्र.क्र 22 मधील हरकानगर परिसरातील ड्रेनेज दुरूस्ती विषयक कामे करणे	415	420810	4208	6 महीने	अतुल गाडे 9604108408
६	PMC/DMC-5/ KASABA/2026/240	पथ	प्र.क्र 22 मध्ये थर्माप्लास्टीक पेंटचे पट्टे मारणे	415	847050	8471	6 महीने	अतुल गाडे 9604108408
७	PMC/DMC-5/ KASABA/2026/241	पथ	प्र.क्र 22 मध्ये काशेवाडी भागात काँक्रीटचे गल्लीबोळ दुरूस्ती विषयक कामे करणे	415	844945	8449	6 महीने	अतुल गाडे 9604108408
८	PMC/DMC-5/ KASABA/2026/242	भवन	प्र.क्र 22 मधील क्रांतीवीर लहुजी वस्ताद शाळा येथे व शाळा क्रमांक 86 मुलींची येथे दुरूस्ती विषयक कामे करणे	415	844789	8448	6 महीने	अतुल गाडे 9604108408
९	PMC/DMC-5/ KASABA/2026/243	भवन	प्र.क्र 22 मधील हरकादास शाळा इंग्लीश मिडीयम व मराठी मिडीयम येथे दुरूस्ती विषय कामे करणे	415	844754	8448	6 महीने	अतुल गाडे 9604108408
१०	PMC/DMC-5/ KASABA/2026/244	गवनी	प्र.क्र 22 मधील काशेवाडी परिसरातील शौचालय दुरूस्ती विषयक कामे करणे	415	844727	8447	6 महीने	अतुल गाडे 9604108408
११	PMC/DMC-5/ KASABA/2026/245	ड्रेनेज	प्र.क्र 22 मधील 512 परिसरात ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे	415	844945	8449	6 महीने	अतुल गाडे 9604108408
१२	PMC/DMC-5/ KASABA/2026/246	भवन	प्रभाग क्र 22 क,काशेवाडी -डायसप्लॉट मध्ये विविध ठिकाणी क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी यांचे कार्यालयीन कामकाज व दुरूस्ती करणे	415	674666	6747	6 महीने	अतुल गाडे 9604108408
१३	PMC/DMC-5/ KASABA/2026/247	गवनी	प्रभाग क्र 23 अ,मध्ये कामगार मैदान पालखी चौक नाना पेठ येथील शौचालय दुरूस्ती विषयक कामे करणे	415	844851	8449	6 महीने	अतुल गुंजाळ 9689937655
१४	PMC/DMC-5/ KASABA/2026/248	गवनी	प्रभाग क्र 23 अ, मधील विविध ठिकाणी सार्वजनिक शौचालय व मुताऱ्यांची दुरूस्ती विषयक कामे करणे	415	844682	8447	6 महीने	अतुल गुंजाळ 9689937655
१५	PMC/DMC-5/ KASABA/2026/249	गवनी	प्रभाग क्र 23 ड, गणेश पेठ मधील शौचालय दुरूस्ती विषयक कामे करणे	415	844727	8447	6 महीने	अतुल गुंजाळ 9689937655
१६	PMC/DMC-5/ KASABA/2026/250	गवनी	प्रभाग क्र 22 ड, मधील क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले समाजमंदिरामध्ये दुरूस्ती करणे	415	844526	8445	6 महीने	तुषार कनेर 8668253497
१७	PMC/DMC-5/ KASABA/2026/251	गवनी	प्र.क्र 22 ड, मधील राजीव गांधी एस.आर.ए समोरील शौचालय दुरूस्ती करणे	415	844567	8446	6 महीने	तुषार कनेर 8668253497
१८	PMC/DMC-5/ KASABA/2026/252	पथ	कागदीपुरा, कसबा पेठ या ठिकाणी व विविध ठिकाणी काँक्रीटीकरण करणे	415	421084	4211	6 महीने	इंद्रजीत देशमुख 9764357365
१९	PMC/DMC-5/ KASABA/2026/253	पथ	स.नं 330 मंगळवार पेठ विविध ठिकाणचे रस्ते गल्लीबोळ काँक्रीटीकरण करणे	415	421084	4211	6 महीने	इंद्रजीत देशमुख 9764357365
२०	PMC/DMC-5/ KASABA/2026/254	ड्रेनेज	स.नं 251 मंगळवार पेठ विविध ठिकाणी गल्लीबोळ काँक्रीटीकरण करणे	415	421164	4212	6 महीने	इंद्रजीत देशमुख 9764357365
२१	PMC/DMC-5/ KASABA/2026/255	पथ	स.नं 226 मंगळवार पेठ येथे विविध ठिकाणी काँक्रीटीकरण करणे	415	421164	4212	6 महीने	इंद्रजीत देशमुख 9764357365
२२	PMC/DMC-5/ KASABA/2026/256	पथ	कुंभारवाडा,कसबा पेठ येथे विविध ठिकाणी काँक्रीटीकरण टाकणे	415	421164	4212	6 महीने	इंद्रजीत देशमुख 9764357365
२३	PMC/DMC-5/ KASABA/2026/257	ड्रेनेज	प्र.क्र 22 अ,मध्ये लोहीयानगर मधील अंजुमन मस्जिद परिसर ड्रेनेज विषयक कामे करणे व तद्नुषंगीक कामे करणे	415	844256	8443	6 महीने	तुषार कनेर 8668253497
२४	PMC/DMC-5/ KASABA/2026/258	ड्रेनेज	प्र.क्र 22 अ,लोहीयानगर येथील रणमर्द मित्र मंडळासमोरील परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे व तद्नुषंगीक कामे करणे	415	844846	8448	6 महीने	तुषार कनेर 8668253497
२५	PMC/DMC-5/ KASABA/2026/259	ड्रेनेज	प्र.क्र 22 अ,मध्ये राजीव गांधी पतसंस्था परिसरा मागील ड्रेनेज लाईन टाकणे व काँक्रीटीकारण करणे	415	844256	8443	6 महिने	तुषार कनेर 8668253497
२६	PMC/DMC-5/ KASABA/2026/260	ड्रेनेज	प्र.क्र 22 अ,मध्ये भवानी पेठ बालाजी मंदिर परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे	415	844534	8445	6 महिने	तुषार कनेर 8668253497
२७	PMC/DMC-5/ KASABA/2026/261	ड्रेनेज	प्र.क्र 22 अ,मध्ये मनपा कॉलनी क्र 10 मधील परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे व दुरूस्ती विषयक कामे करणे	415	844534	8445	6 महिने	तुषार कनेर 8668253497
२८	PMC/DMC-5/ KASABA/2026/262	ड्रेनेज	प्र.क्र 22 अ,मध्ये अमरज्योत मित्र मंडळ परिसरामध्ये ड्रेनेज लाईन टाकणे व दुरूस्ती विषयक कामे करणे	415	844534	8445	6 महिने	तुषार कनेर 8668253497
२९	PMC/DMC-5/ KASABA/2026/263	ड्रेनेज	प्र.क्र 22 अ,सिताई महिला परिसरामध्ये ड्रेनेज लाईन टाकणे व दुरूस्ती विषयक कामे करणे	415	844534	8445	6 महिने	तुषार कनेर 8668253497
३०	PMC/DMC-5/ KASABA/2026/264	ड्रेनेज	प्र.क्र 22 अ,मध्ये गुलटेकडी मांगवाडा लगत सुलभ शौचालय दुरूस्ती करणे	415	844777	8448	6 महिने	तुषार कनेर 8668253497
३१	PMC/DMC-5/ KASABA/2026/265	गवनी	प्र.क्र 22 अ,मध्ये काशेवाडी पोलीस चौकी मागील शौचालय दुरूस्ती करणे व तद्नुषंगीक कामे करणे	415	844777	8448	6 महिने	तुषार कनेर 8668253497
३२	PMC/DMC-5/ KASABA/2026/266	गवनी	प्र.क्र 22 अ,मध्ये मध्ये हरकानगर हर्केश्वर मंदिर परिसरातील शौचालय दुरूस्ती करणे व तद्नुषंगीक कामे करणे	415	844908	8449	6 महिने	तुषार कनेर 8668253497
३३	PMC/DMC-5/ KASABA/2026/267	गवनी	प्र.क्र 22 अ,मध्ये कामगार मित्र मंडळ मागील शौचालय दुरूस्ती करणे व तद्नुषंगीक कामे करणे	415	844908	8449	6 महिने	तुषार कनेर 8668253497
३४	PMC/DMC-5/ KASABA/2026/268	भवन	प्र.क्र 22 अ,मधील जुना मोटार स्टॅण्ड ,मटन मार्केट सुशोभीकरण करणे	415	422878	4229	6 महिने	तुषार कनेर 8668253497
३५	PMC/DMC-5/ KASABA/2026/269	पथ	वीर हनुमान मित्र मंडळ ते अखिल लोहीयानगर मित्र मंडळ येथे फुटपाथ दुरूस्ती करणे व काँक्रीटीकरण करणे	415	418942	4189	6 महिने	तुषार कनेर 8668253497
३६	PMC/DMC-5/ KASABA/2026/270	पथ	लहुजी वस्ताद साळवे शाळा क्र 22 जी मध्ये रंगरंगोटी करणे व इतर तद्नुषंगीक कामे करणे	415	423283	4233	6 महिने	तुषार कनेर 8668253497
३७	PMC/DMC-5/ KASABA/2026/271	ड्रेनेज	जयजवान मित्र मंडळ ते म्हसोबा मंदिर येथे ड्रेनेज विषयक कामे करणे व दुरूस्ती करणे	415	420793	4208	6 महिने	तुषार कनेर 8668253497
३८	PMC/DMC-5/ KASABA/2026/272	ड्रेनेज	लोहीयानगर परिसरातील वकील गल्ली मध्ये ड्रेनेज लाईन काढुन नवीन ड्रेनेज लाईन टाकणे व इतर तद्नुषंगीक कामे करणे	415	421145	4211	6 महिने	तुषार कनेर 8668253497
३९	PMC/DMC-5/ KASABA/2026/273	ड्रेनेज	प्रभाग क्र 22 मधील लोहीयानगर भागातील गल्ली क्रमांक दोन मधील ड्रेनेज दुरूस्ती विषयक कामे करणे	415	421145	4211	6 महिने	तुषार कनेर 8668253497
४०	PMC/DMC-5/ KASABA/2026/274	पथ	प्र.क्र 22 मधील 512 परिसरातील गल्लीबोळ काँक्रीटीकरण दुरूस्ती करून फरशी बसवीणे	415	844762	8448	6 महिने	तुषार कनेर 8668253497
४१	PMC/DMC-5/ KASABA/2026/275	भवन	प्र.क्र 22 मधील आरोग्य कोठयांची दुरूस्ती करणे	415	844138	8441	6 महिने	तुषार कनेर 8668253497
४२	PMC/DMC-5/ KASABA/2026/276	भवन	प्र.क्र 22 मधील चंदुमामा सोनावणे दवाखाना येथे दुरूस्ती विषयक कामे करणे	415	844581	8446	6 महिने	तुषार कनेर 8668253497
४३	PMC/DMC-5/ KASABA/2026/277	गवनी	प्र.क्र 22 मधील कल्याणकर पुल जवळील शौचालय दुरूस्ती विषयक कामे करणे	415	844633	8446	6 महिने	तुषार कनेर 8668253497
४४	PMC/DMC-5/ KASABA/2026/278	गवनी	प्र.क्र 22 मधील डायस प्लॉट खिलारे वस्ती या ठिकाणी ड्रेनेज दुरूस्तीची व साफसफाई ची कामे करणे	415	844937	8449	6 महिने	तुषार कनेर 8668253497
४५	PMC/DMC-5/ KASABA/2026/279	विद्युत	प्र.क्र 22 अंतर्गत स्ट्रीट लाईट पोलला केबल टाकणे व विद्युत विषयक तद्नषंगीक कामे करणे	415	847420	8474	4 महिने	संदिप सरोदे 9822094660
४६	PMC/DMC-5/ KASABA/2026/280	विद्युत	प्र.क्र. 23 नाना पेठ भाजी मंडई ते डोके तालीम साकळी पीर तालीम जेथे तालीम परिसरातील काळे पोल काढुन नवीन पोल उभे करणे	415	847456	8475	4 महिने	संदिप सरोदे 9822094660
४७	PMC/DMC-5/ KASABA/2026/281	विद्युत	प्र.क्र. 22 मधील भगवा चौक ,काशेवाडी व इतर परिसरात नवीन पोल उभारून प्रकाश व्यवस्था करणे	415	423679	4237	3 महिने	संदिप सरोदे 9822094660
४८	PMC/DMC-5/ KASABA/2026/282	विद्युत	प्र.क्र 22 मधील चुडामण तालीम ते भवानी माता मंदिर रामोशी गेट पर्यंत काळे पोल काढुन नवीन पोल बसवीणे	415	423679	4237	3 महिने	संदिप सरोदे 9822094660
४९	PMC/DMC-5/ KASABA/2026/283	विद्युत	प्र.क्र. 22 मोटर स्टँड चौक ते पद्मजी पोलीस चौकी भारत टॉकीज रस्त्यावरील काळे पोल बदलुन नवे पोल उभे करणे	415	423679	4237	3 महिने	संदिप सरोदे 9822094660
५०	PMC/DMC-5/ KASABA/2026/284	विद्युत	प्र.क्र. 22 मधील जुन पोल साठी नवीन केबल टाकणे व जुने सर्व्हीस वायर क ाढणे	415	847420	8474	4 महिने	संदिप सरोदे 9822094660
५१	PMC/DMC-5/ KASABA/2026/285	विद्युत	प्र.क्र. 22 सापिका शाळा चौक ते लडकत पेट्रोल पंप, वॉर्ड ऑफिस च्या रस्यावरील काळे पोल काढुन नवीन पोल बसवीणे	415	423679	4237	3 महिने	संदिप सरोदे 9822094660
५२	PMC/DMC-5/ KASABA/2026/286	विद्युत	प्र.क्र 22 येथे विद्युत पोलला एफआरपी कोटींग करणे	415	847425	8474	4 महिने	संदिप सरोदे 9822094660
५३	PMC/DMC-5/ KASABA/2026/287	विद्युत	प्र.क्र 22 मधील हरकानगर, काशेवाडी शाळा व अभ्यासिका येथील वायरींग विषयक व विद्युत विषयक कामे करणे	415	423726	4237	3 महिने	संदिप सरोदे 9822094660
५४	PMC/DMC-5/ KASABA/2026/288	विद्युत	प्र.क्र 22 मोटर स्टँड चौक ते गोल्डन जुबली व अजमेरा सोसायटी मेन रोडवरील जुने काळे पोल काढुन नवीन पोल उभे करणे	415	423679	4237	3 महिने	संदिप सरोदे 9822094660

५५	PMC/DMC-5/ KASABA/2026/289	विद्युत	प्र.क्र 23 सुभानशाह दर्गा सोन्या मारूती ,भोरी आळी रस्ता येथील येथील काळे पोल काढुन नवीन पोल उभे करणे व प्रकाश व्यवस्था करणे	415	423679	4237	4 महिने	संदिप सरोदे 9822094660
५६	PMC/DMC-5/ KASABA/2026/290	विद्युत	प्र.क्र 24 रास्ता पेठ ,सोमवार पेठ व प्रभागातील मधील विद्युत पोल व केबल विषयक कामे करणे	415	423693	4237	4 महिने	संदिप सरोदे 9822094660
५७	PMC/DMC-5/ KASABA/2026/291	विद्युत	प्र.क्र 23 शिवाजी पुतळा ते लक्ष्मी माता मंदिर व डुल्या मरूती चौका पर्यंत काळे पोल काढुन नवीन पोल बसवीणे	415	847421	8474	4 महिने	संदिप सरोदे 9822094660
५८	PMC/DMC-5/ KASABA/2026/293	गवनी	प्रभाग क्र 23 अ,मधील दाभाडे बोळ व नाना पेठ रस्ता पेठ येथील सार्वजनिक शौचालय व मुतारी दुरूस्ती विषयक कामे करणे(सीटीपीटी)	415	717516	7175	6 महीने	अतुल गुंजाळ 9689937655
५९	PMC/DMC-5/ KASABA/2026/294	गवनी	प्रभाग क्र 23 ड,मध्ये बेलदार आळी व गणेश पेठ रस्ता पेठ परिसरात शौचालय व मुतारी दुरूस्ती विषयक कामे करणे (सीटीपीटी)	415	717516	7175	6 महीने	अतुल गुंजाळ 9689937655
६०	PMC/DMC-5/ KASABA/2026/295	गवनी	प्रभाग क्र 22 अ,लोहीयानगर परिसरात शौचालय व मुतारी दुरूस्ती विषयक कामे करणे (सीटीपीटी)	415	717516	7175	6 महीने	अभिषेक मोरे 968983551
६१	PMC/DMC-5/ KASABA/2026/296	गवनी	प्रभाग क्र 22 ब,मधील 512 हरकानगर शौचालय व मुतारी दुरूस्ती विषयक कामे करणे (सीटीपीटी)	415	717516	7175	6 महीने	अतुल गाडे 9604108408
६२	PMC/DMC-5/ KASABA/2026/122-EX	पथ	प्र.क्र 22 ब,मध्ये हरकानगर येथे ड्रेनेज लाईन व कॉंक्रीटीकारण करणे	1359	2115980	21160	6 महिने	अतुल गाडे 9689946856
६३	PMC/DMC-5/ KASABA/2026/123-EX	भवन	प्रभाग क्र 22 ब,मधील 429/30 डायस प्लॉट सॅलिसबरी पार्क येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हॉस्पिटल मधील विविध दुरूस्ती विषयक कामे करणे	1359	2118333	21183	6 महिने	अतुल गाडे 9689946856
६४	PMC/DMC-5/ KASABA/2026/124-EX	भवन	प्रभाग क्र 22 ब,मधील चंदुकाका सोनावणे हॉस्पिटल प्रसुतीगृह येथील डॉक्टर व पेशंटच्या मागणीनुसार आवश्यक स्वरूपाची विविध दुरूस्तीची कामे करणे	769	1270392	12704	6 महिने	अतुल गाडे 9689946856
६५	PMC/DMC-5/ KASABA/2026/125-EX	विद्युत	प्रभाग क्र 24 ब,मधील कै.तुकाराम हरिभाउ जावळे भवन,कसबा पेठ येथे विद्युत विषयक व तद्नुषंगीक कामे करणे	1359	1450518	14505	4 महिने	संदिप सरोदे 9822094660
६६	PMC/DMC-5/ KASABA/2026/126-EX	ड्रेनेज	प्र.क्र 22 ड,मधील मीरा आनंद परिसरात महावीर जैन मंदिर परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे	769	1268491	12685	6 महिने	तुषार कनेर 8668253497
६७	PMC/DMC-5/ KASABA/2026/127-EX	पथ	प्र.क्र 22 ड,मधील सिद्धार्थनगर परिसरात कॉंक्रीटीकरण करणे	1359	2116079	21161	6 महिने	तुषार कनेर 8668253497
६८	PMC/DMC-5/ KASABA/2026/128-EX	पथ	प्र.क्र 22 ड,मधील मीरा आनंद परिसरात महावीर जैन मंदिर परिसरात कॉंक्रीटीकारण करणे	1359	2116117	21161	6 महिने	तुषार कनेर 8668253497
६९	PMC/DMC-5/ KASABA/2026/129-EX	भवन	प्र.क्र. 22 क,श्रीमती सावित्रीबाई फुले प्रशाला, क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे प्रशाला, कै. पप्पा शेठ खन्ना शाळा, महर्षी हर्कादास विस्यालय येथे दुरूस्ती विषयक कामे करणे	769	1270600	12706	6 महिने	अतुल गाडे 9689946856
७०	PMC/DMC-5/ KASABA/2026/130-EX	ड्रेनेज	प्र.क्र 22 क, हिंद बाल समाज मंदिर परिसर तसेच सापिका पथ रामोशी गेट परिसरात व विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे	769	1268055	12681	6 महिने	अतुल गाडे 9689946856
७१	PMC/DMC-5/ KASABA/2026/131-EX	ड्रेनेज	प्र.क्र 22 क,काशेवाडी मधील नवनाथ मित्र मंडळ परिसर पोलीस चौकी परिसर येथे ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे	1359	1692012	16920	6 महिने	अतुल गाडे 9689946856
७२	PMC/DMC-5/ KASABA/2026/132-EX	गवनी	प्र.क्र 22 क,मधील सार्वजनिक सुलभ शौचालय दुरूस्ती करणे	1359	1692365	16924	6 महिने	अतुल गाडे 9689946856
७३	PMC/DMC-5/ KASABA/2026/133-EX	ड्रेनेज	प्र.क्र 22 क,मधील सॅलसबरी पार्क परिसरात व विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे व इतर ड्रेनेज विषयक कामे करणे	1359	1692145	16921	6 महिने	अतुल गाडे 9689946856
७४	PMC/DMC-5/ KASABA/2026/134-EX	गवनी	प्र.क्र 22 क,मधील विविध परिसरातील सार्वजनिक सुलभ शौचालय दुरूस्ती करणे	1359	1692124	16921	6 महिने	अतुल गाडे 9689946856
७५	PMC/DMC-5/ KASABA/2026/135-EX	ड्रेनेज	प्र.क्र 22 क,काशेवाडी मधील नवनाथ मित्र मंडळ परिसर येथे ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे	769	1268412	12684	6 महिने	अतुल गाडे 9689946856
७६	PMC/DMC-5/ KASABA/2026/136-EX	ड्रेनेज	प्र.क्र 23 अ,नाना पेठ,गणेश पेठ,भवानी पेठ,रविवार पेठ,रास्ता पेठ भागात पावसाळी लाईन टाकणे व तद्नुषंगीक कामे करणे	1359	2115788	21158	6 महिने	अतुल गुंजाळ 9689937655
७७	PMC/DMC-5/ KASABA/2026/137-EX	ड्रेनेज	प्र.क्र 22 अ,मध्ये भवानी पेठ येथील पद्मजी सोसायटी समोरील ड्रेनेज लाईन टाकणे व तद्नुषंगीक कामे करणे	1359	1691633	16916	6 महिने	तुषार कनेर 8668253497
७८	PMC/DMC-5/ KASABA/2026/138-EX	पथ	प्र.क्र 22 अ,मध्ये लोहीयानगर मधील विविध ठिकाणी राडारोडा उचलणे	1359	1999552	19996	6 महीने	तुषार कनेर 8668253497

१) पुणे म.न.पा. ची वरील कामे ही भारतातील कोणत्या ही शासकीय/निम शासकीय यंत्रणाकडील पुर्व नोंदणीचे वैध प्रमाण पत्र असलेल्या ठेकेदारांकडून (प्रत्येक कामासाठीच्या पुर्वपात्रता अटी टेंडर सेट मध्ये नमूद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत आणि निविदेसोबत जोडलेल्या अटी शर्ती वर ठेकेदाराने स्वाक्षरी करून अपाकिटात अपलोड करावयाचे आहे.

२) सदर कामांबाबत निविदा अटी / शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच **www.mahatenders.gov.in** या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्विकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहे.

३) ऑनलाईन निविदा प्रक्रिये संबंधी संपुर्ण माहितीसाठी पुढील क्रमांकावर संपर्क साधावा. Contact No. ०१२०-४२००४६२/०१२०-४००१००२/९१-८८२६२४६५९३.

४) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास व स्विकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.

५) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि) ३२ दि. २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम ई.सी.एस./ आर.टी.जी.एस./ एन.ई.एफ.टी. सुविधेमार्फतच स्वीकारणेत येणार आहे.

स्वाक्षरी/-
माधव के. जगताप
उप आयुक्त
परिमंडळ विभाग क्र. ५
पुणे महानगरपालिका, पुणे

जाहिरात क्र. ४९-DC-५-२०२६ दिनांक : ३०/१०/२०२६

सांगवीतील संविधान शिल्प हटवल्याप्रकरणी

आंदोलनाचा दहावा दिवस



■ पिंपरी (दै. संध्या)

सांगवी येथील संविधान चौकातील संविधान शिल्प हटविल्याच्या प्रकरणी कॉंग्रेस आणि समविचारी संघटनांच्या वतीने सुरू असलेल्या आंदोलनाचा दहावा दिवस आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून न्याय मिळविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असून, आंदोलनाची पुढील दिशा ठरविण्यासाठी सर्वपक्षीय संविधान सन्मान निर्धार सभेचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती कॉंग्रेसचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे यांनी दिली. यावेळी बनसोडे म्हणाले की, संविधान चौकात सुरू असलेल्या आंदोलनाचा आज दहावा दिवस आहे. आंदोलनाच्या माध्यमातून आम्ही निश्चित केलेल्या दिशेने सातत्याने वाटचाल करीत आहोत. उद्या या आंदोलनाच्या माध्यमातून एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात येणार असून, संविधान सन्मान निर्धार सभेचे आयोजन करण्यात आले आहे.सायंकाळी ५ वाजता सांगवी येथील संविधान चौकात ही सभा होणार आहे. या सभेत आंदोलनाचा आढावा घेऊन पुढील दिशा ठरविण्यात येईल. तसेच कायदेशीर लढ्याबाबत सर्वांना सोबत घेऊन सर्वानुमते निर्णय घेण्यात येईल.आंदोलनस्थळी माजी पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी आणि स्व. सरदार वल्लभाई पटेल यांना जयंतीनिमित्त अभिवादन करून विनम्र आदरांजली वाहण्यात आली. संविधानाचा सन्मान, न्याय आणि नागरिकांच्या न्याय्य हक्कांसाठी सुरू असलेला हा लढा अधिक तीव्र करण्याचा निर्धार असून आंदोलनाची पुढील दिशा सर्वांच्या सहमतीने ठरवून न्यायासाठी अधिक जोमाने लढा देण्यात येणार आहे.या संविधान सन्मान निर्धार सभेला आंबेडकरी चळवळीतील नेते, सर्वपक्षीय नेते, पुरोगामी व सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, संविधानप्रेमी नागरिक तसेच बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन नरेंद्र बनसोडे यांनी केले आहे.

सर्वपक्षीय "संविधान सन्मान निर्धार सभा"

चैतन्य दिवाळी अंकाचे दैदिप्यमान प्रकाशन संपन्न

■ प्राधिकरण निगडी (दै. संध्या)

प्राधिकरण ज्येष्ठ नागरिक संघाच्या, चैतन्य दिवाळी अंक २०२६ चे प्रकाशन सोहळा दादा दादी उद्यानामध्ये सायंकाळी अतिशय दैदीप्यमान असा झाला. मान्यवरांच्या हस्ते सरस्वतीपूजन व दीप प्रज्वलन झाल्यानंतर सौ. अनुराधा पेंडुलकर यांनी स्वागत गीत सादर केले. संघाचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर जोशी तसेच संपादिका सौ आशा नष्टे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.दिवाळी अंक वेळेत छापून मिळावा यासाठी विशेष झटणाऱ्या संपादिका सौ.आशा नष्टे यांचा सत्कार श्री.चंद्रशेखर जोशी यांनी शाल,श्रीफळ देऊन केला.

दादा दादी विरंगुळा केंद्रासाठी पोडियम भेट दिलेले श्री.निनाद चिखलीकर यांचा सत्कार डॉ. श्री. गुणवंत चिखलीकर यांनी स्वीकारला.

प्राध्यापक, सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. जगदीश संसारे यांचा परिचय सौ. साधना सपाटे यांनी करून दिला. त्यानंतर त्यांचा अध्यक्ष श्री. चंद्रशेखर जोशी यांनी शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. प्रमुख पाहुणे श्री. किरणराजजी चोप्रा, संचालक सत्यम ज्वेलर्स यांचा परिचय, श्री. विश्वास म्हशेटे यांनी अतिशय मार्मिक पद्धतीने करून दिल्यानंतर त्यांचा सत्कार श्री.दलिचंद शिंगवी (माजी अध्यक्ष) यांनी शाल श्रीफळ देऊन केला.

सर्वजण आतुरतेने वाट पाहत होते अशा या दिवाळी अंकाचा प्रकाशन सोहळा होताना सर्वांनी टाळ्यांचा कडकडाट केला. प्रा. साहित्यिक श्री. जगदीश संसारे यांनी अवघ्या चार दिवसांमध्ये दिवाळी अंक अतिशय बारकाईने वाचून त्यातील लेख, कथा, कविता, प्रवास वर्णन वाचनीय आहेत असा उल्लेख केला, व अंक दर्जेदार झाला आहे असे म्हटले. त्यांनी आपल्या व्याख्यानाने सर्वांना खिळवून ठेवले. संपादक समितीतील सर्वांना त्यांनी विश्वभान प्रतिष्ठान तर्फे सुवर्णपदक प्रदान केले. प्रमुख पाहुणे किरणराजजी चोप्रा यांनी ज्येष्ठांचे आमच्या दुकानांमध्ये स्वागत व त्यांना खास सवलत असेल असा उल्लेख केला.या सोहळ्यात विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे आंतरराष्ट्रीय किर्तीचे पं. श्री.केशव गिंडे यांनी बासरी तसे श्री.सुभाष चव्हाण यांनी शंखवादन करून या कार्यक्रमाला चार चांद लावले.



दिवाळी अंकाकरिता सामाजिक, राजकीय, वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांनी विशेष आर्थिक योगदान दिल्याबद्दल त्यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. सौ. वृषाली गुर्जर, सौ.अस्मिता तारकुंडे, श्रीमती चांदबी सय्यद, सुनील दुर्गे तसेच कार्यकारिणी सदस्यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. सौ स्मिता देशपांडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्याध्यक्षा सौ.अलका बेल्हेकर यांनी आभार प्रदर्शन केले.

दिशा उपक्रमांतर्गत स्ट्रीट फुटबॉल स्पर्धेचे आयोजन



■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या विशेष बाल पथक विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'दिशा' उपक्रमाच्या माध्यमातून तसेच संदेश बोर्डे स्पोर्ट्स फाउंडेशन आणि पिंपरी-चिंचवड पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने स्ट्रीट फुटबॉल स्पर्धेचे आयोजन डॉ. हेडगेवार क्रीडा संकुल, पिंपरी येथे करण्यात आले. या स्पर्धेत बी बी एम एफ सी संघाने अटीतटीच्या अंतिम सामन्यात १-० गोल करत विजेतेपद पटकावले. रायसींग स्टार पिंपरी संघ उपविजेता ठरला. यूनिवर्सल यूनाइटेड निगडी संघाला फेयर प्ले तर माईटी स्टोर्मस संघाला बेस्ट टीम चे पारितोषिक देण्यात आले. पिंपरी-चिंचवड शहरातील झोपडपट्टी व वंचित वस्त्यांमधील मुलांना एकत्र आणून त्यांना खेळाची संधी उपलब्ध करून देणे, त्यांच्यातील क्रीडागुणांना वाव देणे आणि त्यांना सकारात्मक दिशेने वाटचाल करण्यासाठी प्रोत्साहित करणे, हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता.

संदेश बोर्डे स्पोर्ट्स फाउंडेशन आणि 'दिशा' उपक्रमाच्या माध्यमातून गेल्या काही वर्षांपासून पिंपरी-चिंचवड शहरातील विविध पोलीस ठाण्यांच्या परिसरातील मुलांना एकत्र आणून त्यांचे समुपदेशन केले जाते. तसेच प्रशिक्षित क्रीडा प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांना विविध खेळांचे प्रशिक्षण दिले जाते. खेळाच्या माध्यमातून मुलांमध्ये शिस्त, आत्मविश्वास, संघभावना आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याचा या उपक्रमाचा प्रयत्न आहे. या स्पर्धेचे उद्घाटन पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे (IPS) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत निवड झालेल्या पॉल फलेरो यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी उपस्थित विद्यार्थी खेळाडूंना मार्गदर्शन केले. खेळाडूंनी नियमित व्यायाम करावा, योग्य आहार घ्यावा, चांगल्या सवयी अंगीकाराव्यात आणि खेळाकडे सातत्याने लक्ष द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. अशा स्पर्धांमध्ये अधिकाधिक मुलांनी सहभागी होऊन आपल्या जीवनाला योग्य दिशा द्यावी. या माध्यमातून राज्यासाठी आणि देशासाठी उत्कृष्ट खेळाडू घडतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

चाकण मधील वाहतूक कोंडीने गाठला कळस, कामगार व विद्यार्थ्यांचे हाल

● वाहनांच्या लांबलचक रांगा ● उद्योग नगरीतील प्रवास नको रे बाबा म्हणण्याची वेळ

■ चाकण (दै. संध्या)

जगाच्या आंतरराष्ट्रीय नकाशावर सातत्याने नाव झळकत असलेल्या चाकण मधील पुणे - नाशिक महामार्ग आणि तळेगाव - चाकण - शिक्रापूर महामार्गावर वाढत्या वाहनसंख्येच्या तुलनेत रस्त्यांच्या क्षमतेत अपेक्षित वाढ न झाल्याने चाकण परिसरातील वाहतूक व्यवस्था कोलमडली आहे.

चाकण भागातील औद्योगिक विकासाच्या वेगाने वाहनांची संख्या चौपटीने वाढली. मात्र रस्त्यांची रुंदी आणि मूलभूत पायाभूत सुविधा जुन्याच क्षमतेच्या राहिल्या आहेत. परिणामी, दररोज वाहतूक कोंडीचा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. गेल्या दोन दिवसांपासून पुण्याहून नाशिककडे जाणाऱ्या मार्गावर तब्बल सात ते आठ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. या वाहतूक कोंडीत कामगार, प्रवासी, विद्यार्थी यांच्यासह रुग्णवाहिकाही अडकत असल्याने नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. येथील औद्योगिक वसाहतीचा विस्तार, तळेगाव एमआयडीसीतील उद्योगांची वाढ, वाढते नागरीकरण आणि अवजड वाहनांची सततची वर्दळ यामुळे या दोन्ही महामार्गांवरील वाहतुकीचा ताण दिवसेंदिवस वाढत आहे. हजारो मालवाहू ट्रक, कंटेनर, बस, खासगी वाहने आणि दुचाकी एकाच रस्त्यावरून धावत असताना उपलब्ध रस्ते मात्र वाढलेल्या वाहतुकीचा भार पेलण्यास अपुरे पडत आहेत.



विशेषतः औद्योगिक कामकाज सुरू होण्याच्या आणि सुटण्याच्या वेळेत परिस्थिती अधिक गंभीर होते. वाहतुकीत मोठी वाढ झाली असून, रस्त्यांची क्षमता मात्र मर्यादित आहे. तळेगाव-चाकण-शिक्रापूर (राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी) हे दोन प्रमुख औद्योगिक पट्ट्यांना जोडणारे महत्त्वाचे मार्ग आहेत. २०१६ च्या सुमारास या मार्गावर दररोज साधारण १२ ते १५ हजार पीसीयू, वाहतुकीची नोंद होती. उपलब्ध २०२६ च्या आकडेवारीनुसार, ही संख्या आता प्रतिदिन ३९ हजार १९७ ते ४० हजार ८३९ पीसीयूपर्यंत पोहोचली आहे. त्यामुळे या मार्गावरील वाहतुकीचा भार पूर्वीच्या तुलनेत अनेक पटींनी वाढला आहे.

दुसरीकडे, पुणे-नाशिक महामार्गावरही परिस्थिती वेगळी नाही. २०१६ च्या अहवाला नुसार १०००० वाहन शमतेच्या, भोसरी, मोशी ते राजगुरूनगर या पट्ट्यात दररोज साधारण २५ ते ३० हजार पीसीयू वाहतूक होती. २०२६ मध्ये नाशिक फाटा ते चाकणदरम्यानच्या काही टप्प्यांवर हा आकडा ७५ ते ८५ हजार पीसीयूपर्यंत पोहोचल्याचे सांगितले जात आहे. औद्योगिक वाहतूक आणि नागरी वर्दळीत झालेली वाढ लक्षात घेता सध्याचे रस्ते अपुरे ठरत आहेत. विशेष म्हणजे, वाढत्या वाहनसंख्येनुसार रस्त्यांचे रुंदीकरण, उड्डाणपूल, सेवा रस्ते, पर्यायी मार्ग आणि वाहतूक नियोजन वेळेत झाले नाही. परिणामी, महामार्गाचे नाव आणि दर्जा बदलला असला, तरी प्रत्यक्ष रस्त्यांची क्षमता मात्र जुन्याच पातळीवर राहिल्याचे चित्र आहे.

चाकण परिसरात सात ते आठ किलोमीटर वाहनांच्या रांगा लागल्याने जनजीवन विस्कळीत झाले होते. कामगार व विद्यार्थ्यांचे प्रचंड हाल झाले. पुणे बाजू कडून नाशिकच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर वाहनांचा वेग मंदावून मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. काही ठिकाणी वाहनांच्या सात ते आठ किलोमीटरपर्यंत रांगा लागल्या. अवजड वाहनांची मोठी संख्या, अरुंद रस्ते आणि वाढलेला वाहतुकीचा ताण यामुळे वाहनचालकांना तासनतास एकाच ठिकाणी थांबावे लागले.

या कोंडीचा सर्वाधिक फटका औद्योगिक वसाहतीत काम करणाऱ्या कामगारांना बसत आहे. कामावर वेळेत पोहोचणे आणि काम संपल्यानंतर घरी परतणे कठीण झाले आहे. विद्यार्थी, शाळकरी मुले, खासगी प्रवासी वाहने आणि अत्यावश्यक सेवांनाही या कोंडीचा फटका सहन करावा लागला आहे. रुग्णवाहिकांना मार्ग मिळण्यात अडचणी निर्माण होत असल्याने रुग्णांच्या जीविताशी संबंधित गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. काही ठिकाणी अतिक्रमणे हटविण्यात आली असली, तरी वाहतुकीचा वाढता ताण लक्षात घेऊन तात्पुरत्या स्वरूपातही रस्त्यांचे आवश्यक रुंदीकरण करण्यात आलेले नाही. तळेगाव चौक आणि आंबेठाण चौकातील अवैध रिक्षा थांबे तसेच रिक्षांची वाढती संख्या वाहतूक कोंडीत भर घालत आहे. या ठिकाणी रिक्षांचे नियमन, अधिकृत थांब्यांची निश्चिती आणि वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या बाबींवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे.

दि. ३१ ऑगस्टची मुदत संपून दोन महिने उलटले

उद्योग नगरीसह चाकण परिसरातील वाहतूक कोंडी आणि रस्त्यांची दुरवस्था लक्षात घेऊन ऑगस्ट २०२६ मध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी परिसराचा दौरा केला होता. औद्योगिक क्षेत्रातून उद्योग बाहेर स्थलांतरित होण्याची भीती व्यक्त होत असताना त्यांनी संबंधित शासकीय यंत्रणांना वाहतूक आणि पायाभूत सुविधांबाबत तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले होते."

" चुकीच्या ठिकाणी बांधण्यात आलेल्या उड्डाणपुलामुळे चाकणला दररोज तुफान वाहतूक कोंडी होते. या वाहतूक कोंडीने नागरिकांचा जीव गुदमरला असून सर्वजण अक्षरशः रडकुंडीला आले आहेत. चाकणकर नागरिक मरण यातना सहन करत असताना प्रशासन लक्ष देत नाही ही धक्कादायक बाब आहे."

- दिपकभाऊ ताटे, अध्यक्ष, भापसे पार्टी,.

अतिक्रमणे हटवणे हा वाहतूक कोंडीवरील उपाय नाही

जिल्हा प्रशासनाकडून चाकण भागातील महामार्ग आणि परिसरातील रस्त्यांवरील खड्डे बुजविणे, तात्पुरती डागडुजी करणे आणि वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या समस्या दूर करण्याची मुदत देण्यात आली होती. मात्र, खड्डे बुजविणे, अतिक्रमणे हटविणे आणि तात्पुरती डागडुजी करणे म्हणजे वाहतूक कोंडीवरील कायमस्वरूपी उपाय नाही.

" चाकण मध्ये पार्किंग व्यवस्थेचा अभाव असल्याने वाहतूक कोंडीला निमंत्रण मिळते. अवजड वाहनांची वाढती संख्या, अतिक्रमणात भर, महामार्गावर बंद पडणारी वाहने, ओव्हरटेक यामुळे वाहतूक कोंडी होत आहे. वाहतूक कोंडी मार्गी लावण्यासाठी पोलीस प्रशासन विशेष प्रयत्न करत आहे."

- दीपक गोसावी, पोलीस निरीक्षक, चाकण वाहतूक विभाग.

थोडक्यात पण महत्वाचे



अनंतराव पवार महाविद्यालयाच्या वतीने ज्येष्ठ नागरिक शिबिर संपन्न

पिरंगुट : दैनिक संध्या

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बहि:शाल शिक्षण मंडळ व ज्येष्ठ नागरिक सहायता कक्ष, रोटमलनाथ ज्येष्ठ नागरिक संघ, लवळे आणि पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे पिरंगुट येथील अनंतराव पवार महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'एक दिवसीय ज्येष्ठ नागरिक शिबिरा'चे आयोजन दि. २७ ऑक्टोबर २०२६ रोजी रोटमलनाथ ज्येष्ठ नागरिक संघ, लवळे येथे करण्यात आले होते. या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बहि:शाल शिक्षण मंडळ व ज्येष्ठ नागरिक सहायता कक्षाचे संचालक मा. प्रा. डॉ. हरीश नवले उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी. जी. लोबो होते. यावेळी व्यासपीठावर रोटमलनाथ ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष मा. श्री. धोंडिबा कुंभार , प्रा. भरत कानगुडे, श्री. अनिल केदारी, कार्याध्यक्ष अॅड. उत्तम ढोरेसाहेब, उपाध्यक्ष- मा. श्री. आनंदा राऊत, सचिव- मा. श्री. सुदाम गावडे, सल्लागार- मा. श्री. संजय सातव, वक्ते- मा. अॅड. बाबुराव हंद्राळे, डॉ. श्रीकांत नाडगौडा, मा. श्री. बाबासाहेब खराडे, प्रा. डॉ. ज्ञानेश्वर गुळीग, केंद्र कार्यवाह डॉ. गणेश चौधरी आदी उपस्थित होते. यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. बी. जी. लोबो म्हणाले की, महाविद्यालय विद्यार्थ्यांबरोबर समाजासाठी, ज्येष्ठ नागरिकांसाठी सर्व प्रकारच्या मदतीसाठी तयार आहे. तसेच महाविद्यालयाची नाळ समाजाशी जोडण्यासाठी विद्यार्थ्यांबरोबरच समाजाबरोबर राहून त्यांच्यासाठी विविध उपक्रम आम्ही राबवत आहोत. शिबिराच्या माध्यमातून महाविद्यालय लवळे गावच्या ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक वारश्याशी जोडले जात आहे याचा आनंद वाटतो. पुढे ते म्हणाले की, स्थानिक नागरिकांनी महाविद्यालयास अनमोल मदत केलेली आहे, त्यातूनच अद्ययावत सोयीसुविधांसह सर्वगुण संपन्न महाविद्यालय उभे आहे. मुळशी तालुक्यातील अनुदानित असलेले आपले एकमेव महाविद्यालय माफक फी आणि सर्व विद्याशाखांचे शिक्षण देत आहे. तसेच आजच्या काळाशी सुसंगत असलेले विविध नाविन्यपूर्ण आणि व्यावसायिक कोर्सेसची सुरुवात करत आहे. त्याचा फायदा आपल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना होत आहे. पुढे त्यांनी महाविद्यालय ज्येष्ठ नागरिकांसाठी आवश्यक ते विविध उपक्रम राबविणार असल्याचे सांगितले. प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बहि:शाल शिक्षण मंडळ व ज्येष्ठ नागरिक सहायता कक्षाचे संचालक मा. प्रा. डॉ. हरीश नवले यांनी उपस्थित ज्येष्ठ नागरिकांना मौलिक मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनातून त्यांनी बहि:शाल शिक्षण मंडळ व ज्येष्ठ नागरिक सहायता कक्षाची सविस्तर माहिती देऊन त्याची कार्यपद्धती अधोरेखित केली. कक्षाच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांसाठी राबविल्या जात असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

प्रत्येक पारधी कुटुंबांचा सर्वे करणार

दौंड : दैनिक संध्या

राज्यात प्रथमच पारधी समाजाच्या प्रश्नावर थेट सवांद सर्व्हेक्षणात सूचनांचा समावेश करण्याचे आश्वासन आदिवासी आयुक्त लीना बनसोड यांनी दिल्याची माहिती आदिवासी लेखक नामदेव भोसले यांनी दिली आहे. आदिवासी 80 कार्यकर्त्यांनी पारधी समाजाच्या प्रश्नावर आदिवासी आयुक्त यांचेशी चर्चा केलेली होती. राज्यातील पारधी समाजाच्या विविध प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी आदिवासी विभागाच्या आयुक्त लीना बनसोड यांनी राज्यातील ८० पारधी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. या वेळी आयुक्त लीना बनसोड की राज्यातील प्रत्येक पारधी कुटुंबांचा सर्वे करणार... सुमारे ४० कार्यकर्ते प्रत्यक्ष, तर ४० कार्यकर्ते ऑनलाइन सहभागी झाले होते. पारधी समाजाच्या प्रश्नांवर एवढ्या मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांशी थेट चर्चा होण्याचा हा राज्यातील पहिलाच उपक्रम असल्याचे सांगण्यात आले. गेल्या वर्षी स्थापन करण्यात आलेल्या बैठकीचे आयोजन करण्यात आले. विचारवंत हेरंब कुलकर्णी यांच्या पुढाकाराने पारधी समाजाच्या प्रश्नांवर चर्चा घडवून आणली,त्याला आयुक्त बनसोड यांनी तत्काळ प्रतिसाद देत बैठक घेतली. पुणे, नागपूर, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा, अकोला, सोलापूर, सातारा, धाराशिव आणि अहिल्यानगरसह विविध जिल्ह्यांतील कार्यकर्ते सहभागी झाले.

चाकण बाजारात पालेभाज्यांचे भाव तेजीत

■ चाकण (दै. संध्या)

चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये परवल, ओल्या भुईमूग शेंगा, गाजर, दोडका, शेवगा व भोपळ्याची प्रचंड आवक झाली. उष्णतेमुळे पालेभाज्या व फळभाज्यांचे भाव तेजीत आहेत. एकूण उलाढाल ६ कोटी ३० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ८०० क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव ४,३०० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,९०० क्विंटल झाली. बटाट्याला कमाल भाव १,६०० रुपये मिळाला. लसणाची एकूण आवक ३० क्विंटल झाली. लसणाला कमाल भाव १८ हजार रुपये मिळाला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ४८५ क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ४ हजार रुपयां पासून ते ७ हजार रुपयांपर्यंत कमाल भाव मिळाला.

शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे : कांदा - एकूण आवक - ८०० क्विंटल. भाव क्रमांक - १. ४,३०० रुपये, भाव क्रमांक २. ३,५०० रुपये, भाव क्रमांक ३. १,७०० रू. बटाटा - एकूण आवक - १,९०० क्विंटल.भाव क्रमांक १. १,६०० रुपये, भाव क्रमांक २.१,२०० रुपये, भाव



क्रमांक ३.१,१०० रुपये.

फळभाज्या - : फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -

टोमॅटो - ३४४ क्विंटल (६०० ते १,२०० रू.), कोबी - २३५ क्विंटल (४०० ते ६०० रू.), फ्लॉवर - २६० क्विंटल (५०० ते १,००० रु.), वांगी - १५२ क्विंटल (२,००० ते ४,००० रु.), भेंडी - ११४ क्विंटल (२,००० ते ३,५०० रु.), दोडका - ९८ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), कारली - १२८ क्विंटल (१,५०० ते ३,००० रु.), दुधीभोपळा - १०८ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), काकडी - ३८० क्विंटल (१,५०० ते ३,००० रु.), फरशी - ८२ क्विंटल (३,००० ते ४,००० रु.), वालवड - ६८ क्विंटल (४,००० ते ६,००० रुपये), ढोबळी मिरची - १०८ क्विंटल (२,००० ते ५,००० रु.), चवळी - ७४ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), शेवगा - ३२ क्विंटल (४,००० ते ६,००० रु.), गाजर - ११३ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), गवार - ५८ क्विंटल (३,००० ते ८,००० रु.), आले - ६४ क्विंटल (५,००० ते ७,००० रु.), वाटाणा - ४० क्विंटल (८,००० ते १२,००० रु.), पालेभाज्या : चाकण येथील बाजारात पालेभाज्यांची एकूण आवक जुड्यांमध्ये व भाज्यांना मिळालेले भाव पुढीलप्रमाणे - मेथी - एकूण ९ हजार ७२० जुड्या (१,५०० ते २,५०० रुपये), कोथिंबीर - एकूण २४ हजार ७२० जुड्या (१,००० ते २,००० रुपये,), शेपू - एकूण ७ हजार ९०० जुड्या (१,००० ते १,५०० रुपये), पालक - एकूण ८ हजार ५२० जुड्या (८०० ते १,४०० रुपये),.

जिल्हा परिषद म्हणजे ग्रामीण जनतेसाठीची व्यवस्था -काहींच्या निवांत नोकरीची जागा नव्हे!

■ पुरंदर (दै. संध्या)

ग्रामीण भागातील जनता, त्यांची मुलं आणि त्यांचे मूलभूत हक्क यांच्यासाठीच शासनाने शाळा, आरोग्य केंद्रे, प्रशासनिक व्यवस्था आणि विविध सेवा उभारल्या आहेत. ही व्यवस्था कुणाच्या नोकरीसाठी किंवा पगार देण्यासाठी उभी करण्यात आलेली नाही, तर गावोगावी राहणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला दर्जेदार शिक्षण, गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा, वेळेवर प्रशासन आणि जबाबदार सार्वजनिक सेवा मिळावी म्हणून निर्माण करण्यात आली आहे.

मात्र काही ठिकाणी वास्तव पूर्णपणे उलट दिसत आहे. काही शिक्षक, काही कर्मचारी स्वतःला "नोकरी मिळाली" म्हणून समजतात की आता त्यांचं काम फक्त हजेरी लावणे, फाईल फिरवणे, वेळ भरून जाणे एवढंच आहे. ही मानसिकता ग्रामीण समाजाच्या हक्कांवर गदा आणणारी आहे.

शासनाची व्यवस्था – जनतेसाठी, नोकरीसाठी नव्हे!

जिल्हा परिषद शाळा सुरू करण्यामागचा उद्देश शिक्षकांना पगार देणे नव्हे, तर ग्रामीण मुलांना शिकवण्याची संधी देणे, त्यांचं आयुष्य घडवणं हा आहे. आरोग्य केंद्रे उभारण्याचा हेतू डॉक्टरांना जागा देणे नव्हे, तर गावोगावी निरोगी समाज निर्माण करणे हा आहे.

ग्रामसेवक, लिपीक, आरोग्य कर्मचारी, कृषीसेवक, तलाठी हे 'सरकारी कर्मचारी' आहेत म्हणून नव्हे, तर जनतेच्या सेवकांप्रमाणे काम करण्यासाठी त्या जागा निर्माण झाल्या आहेत.

कायद्याने दिलेली नोकरी म्हणजे आरामाचा परवाना नाही!

कर्मचाऱ्यांनी लक्षात ठेवावे – शासन ही संस्था जनतेच्या करातून चालते. त्या करातून तुमचा पगार जातो. म्हणजे जनताच तुमची खरी मालक आहे. मग तिच्यासाठी दर्जेदार सेवा देणं ही जबाबदारी नाही, तर तुमची नैतिक आणि कायदेशीर बांधिलकी आहे.

ग्रामीण मुलं तुमची "जबाबदारी" आहेत, त्यांच्यावर उपकार नाही! काही शाळांमध्ये शिक्षक अनुपस्थित, कामात ढिलाई, सामाजिक उत्तरदायित्वाचा अभाव – ही परिस्थिती स्वतःला शिक्षक म्हणवणाऱ्या व्यक्तीस शोभणारी नाही. मुलांच्या भवितव्याशी खेळणं हा गुन्हाच आहे. आरोग्यसेवेतील दुर्लक्ष ही जनतेच्या जीवाची खिल्ली उडवणं आहे. प्रशासनातील विलंब हा ग्रामीण माणसाच्या वेळेचा आणि हक्कांचा अपमान आहे.

शासनाचे स्पष्ट निर्देश: नियुक्त गाव/शाळा हीच मुख्यालय मानली जाते. मुख्यालय सोडताना पूर्वपरवानगी आवश्यक आहे. अनधिकृत गैरहजेरी किंवा मुख्यालयाबाहेर वास्तव्यासाठी शिस्तभंगात्मक कारवाई होऊ शकते.

ग्रामीण जनता जागी झाली पाहिजे!

तुमच्या करातून चालणाऱ्या सेवेत कोणताही कर्मचारी दुर्लक्ष करत असेल तर त्याला प्रश्न विचारा, त्याच्याकडून हक्काची सेवा मागा, अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार करा, ऑनलाइन तक्रार यंत्रणांचा वापर करा. ग्रामीण भागाचा विकास हा "सरकारचा उपकार" नसून तुमचा संविधानिक हक्क आहे.

कर्मचाऱ्यांना स्पष्ट संदेश – "तुमची जागा जनतेच्या सेवेसाठी निर्माण झाली आहे, तुमच्या सोयीसाठी नाही. दर्जा, पगार, सुविधा मिळतात – कारण ग्रामीण समाज तुमच्यावर विश्वास ठेवतो. तो विश्वास तोडणे म्हणजे जनतेशी विश्वासघात!"

जर शिक्षक/कर्मचारी मुख्यालयात राहत नसतील, शाळेत/कार्यालयात वेळेवर उपस्थित नसतील किंवा सेवा देण्यात दुर्लक्ष करत असतील तर ZP CEO / BDO / संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदवा.

लक्झरीने दिलेल्या धडकेत होलेवाडी येथील तरुण ठार

■ दौंड (दै. संध्या)

पुणे सोलापूर रस्त्यावर लक्झरीने मोटार सायकलला दिलेल्या धडकेत बोरी ऐदी - होलेवाडी येथील तरुण समीर शन्कर होते वय 32 हा जागीच ठार झाला आहे.

हा अपघात गुरुवार दि. 29 ऑक्टोबर रोजी रात्री 10 च्या दरम्यान सहजपूर गावच्या हद्दीत पुणे सोलापूर रस्त्यावर जावजीबुवा मंदिरासमोर घडला आहे. समोर होते हा आपल्या विहिरीवरील वीज पम्प सुरु करून होलेवाडीकडे येत असताना पुण्याहून सोलापूरकडे जाणाऱ्या लक्झरी क्रमांक ए/06 --दि 0081 ने समीरची



मोटार सायकल क्रमांक एम. एच. 61--सी. 9761 ला जोरदार धडक दिली. अपघाताचा मोठा आवाज ऐकूम समीरचा चुलत भाऊ शुभम होले हा घटना स्थळी गेला. तेथे रस्त्यावर जखमी अवस्थेत समीर होते पडलेला दिसला. समीर यास उपचारासाठी यवत येथील ग्रामीण रुग्णालयात नेले असता तो उपचारापूर्वीच मयत झाल्याचे डॉक्तरांनी सांगितले. घटनास्थळी लक्झरी बस उभी करून चालक पळून गेला आहे. याबाबत समीर होते याचा चुलत भाऊ शुभम होते याने यवत पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. पुढील तपास यवत पोलीस करीत आहेत.

समीर होते हा त्याचे घरातील कर्ता तरुण असून त्याचे सर्वांशी सलोख्याचे वागणे असल्याने समीर याचे जाण्याने हळ हळ व्यक्त करण्यात येत आहे.

अत्यवस्थ महिला रुग्णाच्या रुग्णवाहिकेचा रस्ताच उकरला

■ वरवंड (दै. संध्या)

दिनांक २९ ऑक्टोबर २०२६ रोजी वरवंड येथील गणेशवाडी परिसरात एक धक्कादायक घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, एका महिला रुग्णाची प्रकृती अत्यंत गंभीर असताना तिला रुग्णवाहिकेतून घरी आणले जात होते. मात्र, किरकोळ वादातून शेजारील एका कुटुंबाने घरी जाणारा मुख्य रस्ता जेसीबी मशीनच्या साहाय्याने उकरल्याचा तसेच त्या ठिकाणी रिक्षा आडवी लावून रस्ता अडवल्याचा गंभीर प्रकार घडल्याचे समोर आले आहे.

महिला रुग्णाची प्रकृती गंभीर असताना रुग्णवाहिकेचा मार्ग अडवण्याचा हा प्रकार अत्यंत चिंताजनक असून, माणुसकीला काळिमा फासणारा आहे. अशा परिस्थितीत रुग्णाला वेळेत घरी पोहोचवणे आणि आवश्यक उपचार मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. दरम्यान, पाटस पोलीस प्रशासनाने घटनास्थळी धाव घेत अत्यंत गंभीर प्रकृतीच्या महिला रुग्णाला सुरक्षितपणे घरी पोहोचविण्याचे काम केले. पोलिसांच्या या तत्परतेमुळे रुग्णाला घरी पोहोचवणे शक्य झाले. मात्र, किरकोळ वादातून अत्यवस्थ रुग्णाच्या रुग्णवाहिकेचा मार्ग अडवणाऱ्या अशा निर्दयी लोकांची प्रशासनाने गंभीर दखल घ्यावी आणि संबंधितांवर योग्य ती कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.किरकोळ वादापेक्षा माणसाचा जीव महत्त्वाचा नाही का? असा संतप्त सवाल या घटनेच्या निमित्ताने उपस्थित होत आहे.



नवागतांचे उत्साहात स्वागत!

■ नारायणगाव (दै. संध्या)

कॉलेज ऑफ फार्मसी, हडपसर येथे प्रथम वर्ष डी. फार्मसी आणि प्रथम वर्ष बी. फार्मसी या अभ्यासक्रमांमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी तसेच त्यांच्या पालकांसाठी स्वागत समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. भानुदास एस. कुचेकर, सल्लागार, स्कूल ऑफ हेल्थ सायन्स अँड टेक्नॉलॉजी, विश्वनाथ कराड एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे हे उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, सरस्वती पूजन व स्व. अजितदादा पवार साहेब यांच्या प्रतिमेस अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. वाय. पाटील यांनी प्रास्ताविकपर भाषणातून उपस्थित नवागत विद्यार्थी व पालकांचे स्वागत केले. तसेच पुणे जिल्हा शिक्षण मंडळ आणि महाविद्यालयाची स्थापना, कार्य व शैक्षणिक वाटचाल याविषयी माहिती दिली. प्रमुख पाहुणे डॉ. भानुदास एस. कुचेकर यांनी मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांनी शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त, बौद्धिकदृष्ट्या सक्षम आणि सामाजिकदृष्ट्या जागरूक असणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगतीसोबतच व्यक्तिमत्त्व विकास, आरोग्य आणि सामाजिक जबाबदारी यांनाही महत्त्व द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

थोडक्यात पण महत्वाचे

कार्तिकी निलेश जगताप हिची १४ वर्षांखालील मुलींच्या राष्ट्रीय व्हॉलीबॉल संघात निवड



सासवड : दैनिक संध्या

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल (CBSE), सासवड येथील इयत्ता सातवीमध्ये शिकणारी विद्यार्थिनी कु. कार्तिकी निलेश जगताप हिने व्हॉलीबॉल क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ७० व्या राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेअंतर्गत १४ वर्षांखालील मुलींच्या राष्ट्रीय व्हॉलीबॉल संघात तिची निवड झाली आहे. कार्तिकीने सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ येथे आयोजित विभागीय स्तरावरील व्हॉलीबॉल स्पर्धेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले होते. या कामगिरीच्या जोरावर तिची राज्यस्तरीय निवड चाचणीसाठी निवड झाली. त्यानंतर दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ रोजी चिपळूण, जिल्हा रत्नागिरी येथे आयोजित राज्यस्तरीय निवड चाचणीत तिने आपल्या खेळातील कौशल्य, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर प्रभावी कामगिरी करत राष्ट्रीय व्हॉलीबॉल संघात आपले स्थान निश्चित केले. कार्तिकीने घेतलेली मेहनत, अथक प्रयत्न, चिकाटी, समर्पण, सातत्यपूर्ण सराव आणि खेळाप्रती असलेली निष्ठा यामुळे तिला हे उल्लेखनीय यश मिळाले आहे. तिच्या या यशामध्ये शाळेचे शारीरिक शिक्षण शिक्षक व व्हॉलीबॉल प्रशिक्षक श्री. उदय चंद्रशेखर बोरावके यांचे मोलाचे मार्गदर्शन, सहकार्य आणि प्रोत्साहन लाभले. ७० वी राष्ट्रीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धा दिनांक २३ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत अहिल्यानगर (शिर्डी), महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात येणार आहे. या स्पर्धेमध्ये देशभरातील विविध राज्यांचे १४ वर्षांखालील मुले व मुलींचे संघ तसेच CBSE, KVS आणि NVS यांसारख्या राष्ट्रीय शैक्षणिक मंडळांचे संघ सहभागी होणार आहेत. प्रत्येक संघामध्ये १२ खेळाडूंचा समावेश असणार आहे. कार्तिकीची राष्ट्रीय स्तरावर झालेली निवड ही श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड तसेच शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल (CBSE), सासवड यांच्यासाठी अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. तिच्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशस्वी वाटचालीत आणखी एका मानाच्या शिलाफलकाची भर पडली आहे. या अभिमानास्पद यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सर्व पदाधिकारी व संचालक मंडळाचे सदस्य, CBSE इन्चार्ज श्रीमती रेणुका सिंग मर्चंट, CBSE प्राचार्य श्री. अनिल भाऊसाहेब पाटील, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, सर्व शिक्षकवृंद, क्रीडा विभाग तसेच प्रशिक्षक यांनी कार्तिकीचे अभिनंदन केले असून आगामी राष्ट्रीय स्पर्धेसाठी तिला मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

मंगलमय चित्रपट 'रामायण'ची बनली दिव्याच्या तेलाची भागीदार



पुणे: दैनिक संध्या

मंगलमय या पारंपरिक दिया/ लॅम्प तेल ब्रँडने नमित मल्होत्रा यांच्या 'रामायण: राइज ऑफ अ लेजेंड' या बहुप्रतिक्षित दिवाळी विशेष चित्रपटासोबत सहयोग केला आहे. हा चित्रपट ५ नोव्हेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे. दिवा लावण्याचे सामायिक सांस्कृतिक महत्त्व आणि या महाकाव्याच्या शाश्वत मूल्यांवर आधारलेल्या या सहयोगाचा देशातील अत्यंत शुभ सणासुदीच्या काळात ब्रँड आणि भारतातील कुटुंबांमध्ये घट्ट नाते निर्माण करण्याचा मानस आहे. ग्राहकांशी थेट संवाद साधण्याच्या उपक्रमांचा भाग म्हणून, ':मंगलमय' सोशल मीडियावर विविध स्पर्धांचे आयोजन करणार आहे. या स्पर्धांमधील विजेत्यांना 'रामायण' विषयाशी संबंधित विशेष भेटवस्तू दिल्या जातील, ज्यामध्ये 'अमर चित्र कथा' कॉमिक बुकच्या एका विशेष आवृत्तीचाही समावेश असेल. ': मंगलमय 'च्या प्रत्येक बाटलीवर दिवाळीनिमित्त खास स्टिकर्स असतील, जे ग्राहकांसाठी एक विशेष आकर्षण ठरतील. याव्यतिरिक्त, ': मंगलमय ' एका स्वयंसेवी संस्थेसोबत (एनजीओ) मिळून विशेष पणत्या तयार करत आहे; याद्वारे महिला कारागिरांना पाठबळ दिले जात असून महिला सक्षमीकरणाला प्रोत्साहन दिले जात आहे. 'मंगलमय'ची उत्पादने झेप्टो, स्विगी, बिगबास्केट आणि कंपनीच्या अधिकृत वेबसाइट https://mangalmai.in वर उपलब्ध आहेत. हा ब्रँड ९०० मिलीसाठी २२५ रुपये, ४५० मिलीसाठी ११८ रुपये आणि १५० मिलीसाठी ४५ रुपये या एमआरपीवर उपलब्ध आहे. हा सहयोग मंगलमयसाठी धोरणात्मक दृष्ट्या अत्यंत महत्वाचे आहे . जिथे ग्राहक सणासुदीचे विधी, कथा आणि कौटुंबिक परंपरांमध्ये उत्साहाने सहभागी होत असताना हा सहयोग पारंपरिक पूजेची अत्यावश्यक गोष्ट आणि सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण सिनेमॅटिक कलाकृतीला एकत्र आणतो. भारताच्या सांस्कृतिक जाणीवेमध्ये खोलवर रुजलेल्या रामायण कथेशी स्वतःला जोडून मंगलमयचे वैशिष्ट्यपूर्ण आठवणींचा हा मंगलमय दिवा सतत तेवत राहील, ग्राहकांशी संवाद वाढवणे आणि पिढ्यानपिढ्या घराघरांमध्ये आपले महत्त्व अधिक दृढ करण्याचे उद्दिष्ट आहे. हा सहयोग समकालीन, बहु-प्लॅटफॉर्म मोहिमेद्वारे दैनंदिन पूजा आणि शुभ प्रसंगी दिवा लावण्याच्या भूमिकेचा संदेश देण्याची संधी देखील देतो.

सीबीएसई राष्ट्रीय एरोबिक्स स्पर्धेत हेवनचा डंका



पिंपरी-चिंचवड : दैनिक संध्या

सीबीएसई राष्ट्रीय एरोबिक्स अजिंक्यपद स्पर्धेत हेवन स्पोर्ट्स अँड फिटनेस अकादमीच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत पिंपरी-चिंचवडच्या क्रीडा क्षेत्राचा नावलौकिक वाढविला आहे. या स्पर्धेत राही फूलतांबकर हिने सुवर्णपदक, तर अंजनेय नखाते याने कांस्यपदक पटकावून घवघवीत यश संपादन केले. पिंपरी-चिंचवडमधील मोशी येथील एसएनबीपी समूहाच्या वतीने दिनांक २७ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत भव्य सीबीएसई राष्ट्रीय एरोबिक्स अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा महोत्सवात देशभरातील तसेच परदेशातील सीबीएसई शाळांमधील २,५०० हून अधिक विद्यार्थी खेळाडूंनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेत पोदार इंटरनॅशनल स्कूल, चिंचवड येथून सहभागी झालेल्या राही फूलतांबकर हिने १४ वर्षांखालील वयोगटातील एरोबिक्स प्रकारात ८.८० गुण मिळवत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. तसेच एसएनबीपी इंटरनॅशनल स्कूल, रहाटणी येथून सहभागी झालेल्या अंजनेय नखाते याने याच वयोगटात ८.४८ गुण मिळवत कांस्यपदकाची कमाई केली. विशेष म्हणजे, हे दोन्ही गुणवंत खेळाडू हेवन स्पोर्ट्स अँड फिटनेस अकादमीमध्ये नियमित सराव करतात. राही गेल्या पाच वर्षांपासून, तर अंजनेय गेल्या तीन वर्षांपासून अकादमीमध्ये प्रशिक्षण घेत आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण सरावाचे, शिस्तीचे आणि मेहनतीचे हे यशस्वी फलित असल्याचे मत क्रीडाक्षेत्रातून व्यक्त होत आहे. या स्पर्धेत अकादमीच्या इतर खेळाडूंनीही चांगली कामगिरी केली. रिया पळे हिने १४ वर्षांखालील वयोगटात पाचवा क्रमांक, तर आर्वी कोल्हे हिने दहावा क्रमांक मिळविला. सिद्धी मारे हिनेही उत्कृष्ट सादरीकरण करत स्पर्धेत आपला सहभाग नोंदविला. खेळाडूंच्या या यशामागे त्यांचे सातत्यपूर्ण प्रशिक्षण, योग्य मार्गदर्शन, कठोर परिश्रम आणि पालकांचे सहकार्य यांचा मोलाचा वाटा आहे.



वांद्रे पोलीस ठाण्यात सरदार वल्लभभाई पटेल जयंती साजरी

■ मुंबई (दै. संध्या)

वांद्रे पोलीस ठाण्यात (पश्चिम) ३१/१०/२०२६ रोजी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त गुजरातमधील "एकता परेड" चे थेट प्रक्षेपण आयोजित केले.

या कार्यक्रमाला सेंट स्टॅनिस्लॉस हायस्कूलचे एनसीसी, स्काऊट्स, आरएसपी केडर्स आणि फादर ॲग्नेल विद्यार्थी, शिक्षक तसेच वांद्रे पोलीस मोहल्ला समितीचे सदस्य उपस्थित होते. उपस्थित असलेल्या सर्वांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत थेट प्रक्षेपणाद्वारे राष्ट्रीय एकतेची शपथ घेतली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र साळुंके, जनसंपर्क अधिकारी पोलीस निरीक्षक सचिन राणे यांच्या नेतृत्वाखाली हवालदार मुलिक, पोलीस कॉन्स्टेबल आर. खोमाणे आणि पोलीस कॉन्स्टेबल व्ही. शिंदे यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम उत्तमरित्या आयोजित करण्यात आला होता.

१ नोव्हेंबरपासून 'आरोग्य संवाद यात्रा', आरोग्यमंत्री साधणार थेट जनतेशी संवाद

■ मुंबई (दै. संध्या)



राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि लोकाभिमुख करण्यासाठी सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या पुढाकारातून राज्यव्यापी आरोग्य संवाद यात्रा आयोजित करण्यात येत आहे. १ नोव्हेंबरला नांदेड येथून आरोग्यमंत्री यांच्या उपस्थितीत शुभारंभ होणारी ही यात्रा ५ डिसेंबर २०२६ पर्यंत चालणार आहे. या यात्रेच्या माध्यमातून आरोग्यमंत्री थेट जनतेशी संवाद साधणार असून, राज्यातील आरोग्यसेवांचा आढावा घेऊन त्यातील त्रुटी दूर करण्यावर भर दिला जाणार आहे.

'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाशी यात्रेची सांगड घालून सार्वजनिक स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, पोषण, सांडपाणी व्यवस्थापन, आजारांचे नियंत्रण आणि आरोग्यदायी जीवनशैलीबाबत जनजागृती केली जाणार आहे. प्रतिबंधात्मक आरोग्य उपायांमध्ये ग्रामपातळीवरील सहभाग वाढविण्यावरही भर राहणार आहे.

आरोग्य संवाद यात्रा ही केवळ आरोग्य योजनांची माहिती देणारी मोहीम राहणार नसून, नागरिकांच्या अनुभवातून आरोग्य व्यवस्थेतील सुधारणा निश्चित करण्याचा प्रयत्न आहे. आरोग्य समित्या, लोकप्रतिनिधी, आरोग्य कर्मचारी, वैद्यकीय व्यावसायिक आणि सर्वसामान्य नागरिक यांच्यात समन्वय वाढवून आरोग्य सेवांबाबत उत्तरदायित्व मजबूत करण्यावर भर राहणार आहे. या आरोग्य संवाद यात्रेत १२५ नवीन संस्थांचे लोकार्पण करण्यात येणार आहे.

सोबतच जिल्हा एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती, विधानसभा मतदारसंघ समिती, रुग्ण कल्याण समिती, जन आरोग्य समिती, ग्राम आरोग्य, पोषण स्वच्छता समिती यापैकी एका समितीसोबत बैठक व चर्चा करण्यात येईल. शासकीय आरोग्य संस्थांच्या कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी व आढावा घेण्यात येईल.

संपूर्ण थकबाकी भरल्याशिवाय वीज कनेक्शन जोडू नका : दिनेश अग्रवाल

कार्यकारी संचालकांकडून पुणे परिमंडलात वीजबिल वसुलीसाठी आकस्मिक भेटी

■ पुणे(दै. संध्या)



वीजबिलाच्या थकबाकीपोटी खंडित केलेली वीजजोडणी चालू वीजबिलासह संपूर्ण थकबाकी भरल्याशिवाय पूर्ववत करू नये, अशा सक्त सूचना महावितरणचे कार्यकारी संचालक (वीज खरेदी) दिनेश अग्रवाल यांनी दिल्या. ऑक्टोबर महिन्याच्या अखेरच्या दिवशी त्यांनी विश्रांतवाडी आणि वाडिया उपविभागांना आकस्मिक भेटी देऊन थकबाकीदारांच्या खंडित वीजजोडण्यांची पडताळणी केली.

वाडिया उपविभागातील मे. फिस्टहाऊस हॉस्पिटॅलिटी आणि प्रभावती नामदेव पिंगळे या दोन थकबाकीदारांच्या वीजजोडण्यांची त्यांनी तपासणी केली. या ग्राहकांकडे अनुक्रमे ७ लाख ६९ हजार रुपये आणि ५ लाख ४४ हजार रुपये थकबाकी होती. मे. फिस्टहाऊस हॉस्पिटॅलिटी या ग्राहकाकडून हप्त्यांमध्ये रक्कम भरली जात असल्याने थकबाकी कायम राहत असल्याचे निदर्शनास आले. अशा प्रकरणांत चालू वीजबिलासह संपूर्ण देय रक्कम वसूल झाल्यानंतरच वीजजोडणी पूर्ववत करावी, असे अग्रवाल यांनी स्पष्ट केले. वीजबिल वसुलीची कार्यवाही केवळ कार्यालयीन स्तरावर मर्यादित न ठेवता अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष क्षेत्रात उतरून तिचा आढावा घ्यावा, असे त्यांनी सांगितले. यावेळी थकबाकी वसुलीसाठी सुरू असलेल्या उपाययोजनांना अधिक गती देऊन चालू वीजबिलासह थकबाकी वसूल करण्याचे निर्देश दिले.वीजग्राहकांना सेवा देणे ही महावितरणची जबाबदारी आहे, तर वेळेत वीजबिल भरणे हे ग्राहकांचे कर्तव्य आहे. ग्राहकांमध्ये नियमित वीजबिल भरण्याची सवय निर्माण करण्यासाठी अधिकाऱ्यांनी सातत्याने पाठपुरावा करावा. थकबाकी वाढण्यापूर्वीच नियमानुसार वीजपुरवठा खंडित केल्यास सुरक्षा ठेवीतून थकीत रक्कम वळती करण्याची वेळ येणार नाही, असेही अग्रवाल यांनी नमूद केले. या पाहणीवेळी प्रभारी मुख्य अभियंता ज्ञानदेव पडळकर, कार्यकारी अभियंता रवींद्र बुंदिले, अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रमोदकुमार गायकवाड आणि अमिता देशमुख उपस्थित होते.

मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अमरावती विभागात यशस्वी करावे : नयना गुंडे

■ अमरावती (दै. संध्या)

लोकसहभाग वाढवून व नवीन शासन निर्णयातील निकषांचे तंतोतंत पालन करून अमरावती विभागातील जास्तीत जास्त ग्रामपंचायती, पंचायत समिती व जिल्हा परिषदा स्पर्धेमध्ये पात्र होतील यासाठी सर्व यंत्रणा व यंत्रणांच्या अधिकारी-कर्मचारी यांनी परिश्रम घ्यावेत व समन्वयाने अमरावती विभागात मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान यशस्वी करावे असे आवाहन अमरावती विभागाच्या विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले.

मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाबाबत अमरावती विभागाच्या विभागीय आयुक्त नयना गुंडे यांच्या अध्यक्षतेखाली विभागातील पाचही जिल्ह्यांतील जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांचे प्रकल्प संचालक व सर्व तालूक्यांचे गट विकास अधिकारी यांच्यासाठी शुक्रवारी विभागीय कार्यशाळेचे दुरदृष्यप्रणालीव्दारे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करतांना त्या बोलत होत्या.

सुविधा उपलब्ध करून देणे

राज्यातील आरोग्य सेवांमध्ये गुणात्मक सुधारणा करणे, प्रत्येक नागरिकाला आरोग्याच्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजाराचे प्रमाण कमी करून त्याचे निर्मूलन करणे आणि माता व बालकांचे आरोग्यमान उंचावणे, या मुख्य उद्देशाने राज्य शासनाने ग्राम पातळीवर विकासाची नवी दिशा ठरविणारे एक प्रभावी अभियान आणले आहे. शासनाच्या "प्रजा निरोगी, तर राज्य सशक्त" या तत्त्वज्ञानावर आधारीत, गावांमधील नागरिकांना सुदृढ आणि सशक्त बनवण्यासाठी, "माझं गाव, आरोग्य संपन्न गाव" हे अभियान राज्यात सुरु करण्यात आले आहे.शासनाने निर्देश दिल्यानूसार सर्व ग्रामपंचायती व आरोग्य संस्थांनी अभियानात सक्रीय सहभागी व्हावे व प्रभावीपणे कामगिरी करावी असे आवाहनही श्रीमती गुंडे यांनी यावेळी केले.

या कार्यशाळेत मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाबाबत महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या नवीन आलेल्या ११ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयातील सुशासन पंचायत, सक्षम पंचायत, जलसमृध्द गाव, स्वच्छ व हरीत गाव, योजनांचे अभिसरण, संस्था बळकटीकरण, उपजीविका विकास व सामाजिक न्याय तसेच लोकसहभाग आणि श्रमदान या आठ घटकांवर या कार्यशाळेत सविस्तर मार्गदर्शन व चर्चा करण्यात आली. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या जिल्हयाच्या नियोजनाचे यावेळी सादरीकरण केले. तसेच विभागातील प्रत्येक जिल्हयातून दोन पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी यांनी पंचायत समित्यांच्या नियोजनाचे सादरीकरण केले.

विभागीय आयुक्त यांनी प्रधानमंत्री आवास योजनेचा तालूकानिहाय आढावा घेतला व उर्वरित घरकुलांची कामे त्वरीत पुर्ण करण्याबाबत सूचित केले. तसेच टंचाई कालावधीत चारा लागवड, नेपीयर गवत लागवड, जलसंधारणाची कामे, उपजीविका व व्हिबीजी रामजी अंतर्गत कामे करण्याच्या सुचनाही त्यांनी यावेळी केल्या.

डिजिटल हयातीचा दाखला मोहिमेस प्रारंभ



■ मुंबई (दै. संध्या)

राज्यशासनाच्यासर्वनिवृत्तीवेतनधारक आणि कुटूंब निवृत्तीवेतनधारकांना पुढील वर्षाचे पेन्शन सुरळीत सुरू ठेवण्यासाठी दरवर्षी नोव्हेंबर महिन्यात सादर करावा लागणारा हयातीचा दाखला सादर करणे (लाइफ सर्टिफिकेट) आता अधिक सुलभ होणार आहे. केंद्र सरकारच्या पेन्शन आणि पेन्शनभोगी कल्याण विभागातर्फे (DOPPW) १ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत देशभरातील २ हजार शहरे आणि जिल्ह्यांमध्ये पाचवी देशव्यापी 'डिजिटल लाइफ सर्टिफिकेट' (DLC) मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या पार्श्वभूमीवर वांद्रे येथील अधिदान व लेखा कार्यालयात पूर्वतयारीचा आढावा घेण्यात आला.

ही मोहीम आतापर्यंतची सर्वात मोठी डिजिटल जीवन प्रमाणपत्र मोहीम मानली जात असून, केंद्र सरकारच्या 'जीवन प्रमाण' ॲपच्या माध्यमातून ज्येष्ठ पेन्शनधारकांना बँक किंवा कोषागार कार्यालयात प्रत्यक्ष न जाता केवळ मोबाईलवरून घरबसल्या जीवन प्रमाणपत्र सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या देशव्यापी मोहिमेच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या पेन्शन आणि पेन्शनभोगी कल्याण विभागाचे अवर सचिव दीपक गुप्ता यांनी मुंबईतील अधिदान व लेखा कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी संचालनालय, लेखा व कोषागारे तसेच अधिदान व लेखा अधिकारी प्रगती धनावडे आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत मोहिमेच्या नियोजनावर सविस्तर चर्चा केली. भेटीदरम्यान गुप्ता यांनी कार्यालयातील निवृत्तीवेतन शाखा आणि पेन्शन मदत कक्षाची पाहणी केली. उपस्थित ज्येष्ठ निवृत्तीवेतनधारकांना 'जीवन प्रमाण' प्रणालीद्वारे आणि फेस ऑथेंटिकेशनच्या माध्यमातून अवघ्या काही मिनिटांत जीवन प्रमाणपत्र कसे तयार करता येते.

सिद्धी महिला कल्याणकारी संस्थेचा स्तुत्य उपक्रम ; तृतीयपंथीयांना दिवाळी भेट व धान्य किटचे वाटप!

■ मुंबई (दै. संध्या)

दिवाळी सणाचे औचित्य साधून सिद्धी महिला कल्याणकारी संस्थेच्या वतीने तृतीयपंथीय बांधव-भगिनींसाठी दिवाळी आनंदोत्सव आणि मदतीचा उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी, माणुसकी आणि सर्वसमावेशकतेचा संदेश देण्यात आला.

शुक्रवार, दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ रोजी भांडुप येथे राहुल आर्ट यांच्या सहकार्याने तृतीयपंथीय बांधव-भगिनींना दिवाळी भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी आपापल्या कलागुणांचे सादरीकरण करून कार्यक्रमात उत्साहाची भर घातली. या कार्यक्रमाला अनिरुद्ध ओव्हाळ समितीच्या उपाध्यक्षा जयश्री ओव्हाळ ताई यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच शनिवार, दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी कांजूरमार्ग येथे स्मिता कवडे यांच्या हस्ते तृतीयपंथीय बांधव-भगिनींना धान्याच्या किटचे वाटप करण्यात आले. या दोन्ही उपक्रमांमध्ये एकूण ५० तृतीयपंथीय बांधव-भगिनी सहभागी झाले होते. सर्वांनी एकत्र येत दिवाळीचा आनंद साजरा केला.

समाजातील प्रत्येक घटकाला सण-उत्सवाचा आनंद घेता यावा, त्यांनाही आपलेपणाची जाणीव व्हावी आणि त्यांचा सन्मान राखला जावा, या उद्देशाने सिद्धी महिला कल्याणकारी संस्थेने हा उपक्रम राबविला. संस्थेच्या या सामाजिक कार्याचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.

माणुसकीचा दिवा प्रत्येकाच्या आयुष्यात उजळावा, हाच या उपक्रमामागील खरा संदेश ठरला.






दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
सोमवार, दि. ०२ नोव्हेंबर २०२६

पुणे शहर व जिल्हा

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



सुपा पोलीस स्टेशनच्या वतीने भव्य व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन

सुपा : दैनिक संध्या

भारताचे लोहपुरुष व देशाचे पहिले उपपंतप्रधान तथा गृहमंत्री स्वर्गीय सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त तसेच राष्ट्रीय एकता दिनाचे औचित्य साधून सुपा पोलीस स्टेशनच्या वतीने व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सुपा पोलीस स्टेशन हद्दीतील मोरगाव,सुपा,पानसरेवाडी व खोर परिसरातील एकूण पाच संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.सर्व संघांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत अत्यंत चुरशीच्या व खेळीमेळीच्या वातावरणात स्पर्धा यशस्वीरीत्या पार पाडली. स्पर्धेचा अंतिम निकाल पुढीलप्रमाणे राहिला. प्रथम क्रमांक – श्री मयुरेश्वर संघ,मोरगाव द्वितीय क्रमांक – सुपा पोलीस स्टेशन संघ तृतीय क्रमांक – पानसरेवाडी व्हॉलीबॉल संघ विजेत्या संघांना आकर्षक ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.यावेळी सर्व सहभागी खेळाडूंचे सुपा पोलीस स्टेशनच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. या कार्यक्रमास पोलीस स्टेशन हद्दीतील प्रतिष्ठित नागरिक,पत्रकार बांधव तसेच परिसरातील सुमारे ५० ते ६० खेळाडू व क्रीडाप्रेमी नागरिक उपस्थित होते. युवकांमध्ये क्रीडाभावना,संघभावना,शिस्त, बंधुभाव आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृद्धिंगत व्हावी,तसेच पोलीस व नागरिक यांच्यातील परस्पर विश्वास,सुसंवाद आणि सामाजिक सलोखा अधिक दृढ व्हावा,या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय एकता दिनानिमित्त आयोजित या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अशा क्रीडा उपक्रमांमुळे युवकांना सकारात्मक दिशा मिळून समाजात एकता,बंधुता व खिलाडूवृत्तीची भावना अधिक बळकट होण्यास मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.



पत्रकार दामोदर जगदाळे यांचे दुःखद निधन

जुन्नर : दैनिक संध्या

जुन्नर येथील पत्रकार दामोदर नामदेव जगदाळे (वय ५७) यांचे रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने पत्रकारिता, सहकार क्षेत्रासह जुन्नर परिसरात शोककळा पसरली आहे. दामोदर जगदाळे हे पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न, स्थानिक समस्या आणि सर्वसामान्यांच्या अडचणींना आपल्या लेखणीतून वाचा फोडणारे व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. पत्रकारितेबरोबरच ते विघ्नहर सहकारी साखर कारखान्यात कर्मचारी म्हणून कार्यरत होते. कारखान्यातील अधिकारी व कर्मचारी वर्गाशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते.त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच विघ्नहर सहकारी साखर कारखान्याच्या अधिकारी व कर्मचारी वर्गाने तीव्र दुःख व्यक्त करून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. जुन्नर तालुका मराठी पत्रकार संघाचे ते माजी अध्यक्ष होते.त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन मुली असा परिवार आहे.

रमेश येवले यांचा राजकारणाला पूर्णविराम

मंचर : दैनिक संध्या

आंबेगाव तालुक्यात सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात गेल्या तीन वर्षांपासून सक्रिय असलेले, दांडगा जनसंपर्क आणि दानशूर व्यक्तिमत्त्व अशी ओळख निर्माण केलेले महाविकास आघाडीचे नेते रमेशभाऊ येवले यांनी आपल्या राजकीय वाटचालीला पूर्णविराम देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. रविवारी (ता. १) त्यांनी सोशल मीडियाद्वारे ही घोषणा केल्याने आंबेगाव तालुक्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. त्यांच्या या अनपेक्षित निर्णयामागील नेमकी भूमिका काय, याबाबत राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चांना सुरुवात झाली आहे. दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून रमेशभाऊ येवले यांनी आंबेगाव तालुक्यात सामाजिक कार्याला सुरुवात केली.

नीरा नदीकाठी १२ नोव्हेंबरला होणार

निरामाईच्या तीर्थाची भव्य गंगाआरती

- लोगो अनावरण व कार्यक्रम घोषणा
- पाणी बचतीसाठी घेतली जाणार शपथ
- वाराणसीतील सात पंडीतांच्या हस्ते होणार गंगाआरती



■ नीरा (दै. संध्या)

पुणे आणि सातारा जिल्ह्याच्या सीमेवरून शेकडो वर्षापासून वाहणारी नीरा नदी अर्थात निरामाईच्या पवित्र तीर्थाची दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभुमीवर निरामाई गंगाआरती गुरूवारी १२ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी सहा वाजता वाराणसीचे सात पंडीतांच्या हस्ते नीरा नदी काठावर माऊलींच्या शाही स्नानाच्या ठिकाणी होणार असल्याची माहिती आयोजक मंगेश ढमाळ यांनी दिली. आजपर्यंत राज्यात अनेकवेळा दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होवून देखील नीरा नदीने अर्थात निरा माईने नीरानदीच्या काठावरील तसेच परिसरातील शेतक-यांसह सर्वसामान्य जनतेला पाण्याची उणीव भासू दिली नाही. सद्या तर अल निनोच्या सावटामुळे राज्यात पर्जन्यमान कमी झाल्यामुळे महाराष्ट्रात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. ही परिस्थिती ऑगस्ट २०२७ पर्यंत राहणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे.मात्र तरीही निरामाई आपल्याला पाणी कमी पडू देणार नाही या उद्दात्त हेतूने 'हर..हर.. गंगे, जय..जय. गंगे च्या जयघोषात गुरूवारी (दि.१२) सायंकाळी सहा वाजता निरामाईची गंगा आरती वाराणसीच्या सात पंडितांच्या हस्ते व हजारो जनसमुदायाच्या साक्षीने नीरा नदीवरील दत्तघाटावरील माऊलींच्या शाही स्नानाच्या ठिकाणी करण्यात येणार असून नीरा - पाडेगांव पंचक्रोशीतील नागरिकांनी गंगा आरतीस उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक मंगेश ढमाळ मित्र परिवाराच्या वतीने करण्यात आले. तसेच या भव्य गंगाआरतीच्या लोगोचे अनावरण नुकतेच श्री.दत्त घाटावर माजी बांधकाम सभापती दत्ताजीराव चव्हाण, तरडगांवचे जि.प.सदस्य गिरीश बनकर, नीरेचे उपसरपंच राजेश काकडे, पाडेगांवचे माजी सरपंच विजयराव धायगुडे, माजी उपसरपंच रघुनाथ धायगुडे, शंकरराव मर्दाने, गजानन माने, दत्तसेवा मंडळाचे अध्यक्ष प्रदीप काकडे, सेक्रेटरी व्यंकटराव धायगुडे, ह. भ. प. विशाल महाराज थोपटे, सचिनकाका घोडके, प्रशांत ढावरे, तनुजा शहा आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी स्वप्निल कांबळे, अमेय गारुळे, धमाका ग्रुपच्या सदस्या यांच्यासह नीरा - पाडेगांव येथील भाविक उपस्थित होते. यावेळी दत्ताजीराव चव्हाण, गिरीश बनकर, राजेश काकडे यांनी या कार्यक्रमास सर्वातोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

पाणी बचतीची घेतली जाणार शपथ

सद्या राज्यात दुष्काळी परिस्थिती असून नागरिकांनी पाणी बचतीची सवय लागावी या करिता गुरूवार दि.१२ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी सहा वाजता निरामाईची गंगाआरती झाल्यानंतर उपस्थित नागरिकांना पाणी बचतीची शपथ दिली जाणार असल्याचे मंगेश ढमाळ यांनी सांगितले.

कबड्डी स्पर्धा उत्साहात संपन्न



■ नारायणगाव (दै. संध्या)

ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळ आळे, संतवाडी, कोळवाडी संचलित मा. बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळे येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे अंतर्गत पुणे जिल्हा क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा (मुले व मुली) उत्साहात व क्रीडामय वातावरणात पार पडल्या. या स्पर्धेतील मुलींच्या गटात सांगवी महाविद्यालयाने विजेतेपद पटकावले, तर बीजीएस वाघोली महाविद्यालयाने उपविजेतेपद संपादन केले. स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या विविध महाविद्यालयांतील खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. या स्पर्धेतील गुणवंत खेळाडूंमधून पुणे जिल्ह्याचा कबड्डी संघ निवडण्यात आला. सदर स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रविण जाधव, सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच मेजर सुषमा कदम, लेफ्टनंट भगत शशिकांत, कॅप्टन डॉ. रावसाहेब गरड, प्रा. संजय वाकचौरे तसेच एनसीसी कॅडेट्स यांचे स्पर्धेच्या नियोजन व यशस्वी अंमलबजावणीसाठी बहुमोल सहकार्य लाभले. सर्वांच्या एकत्रित प्रयतांमुळे स्पर्धेचे आयोजन शिस्तबद्ध व यशस्वीरीत्या पार पडले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने सर्व सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचे, कर्मचारी, एनसीसी कॅडेट्स तसेच सहभागी खेळाडूंचे आभार व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अजय कुऱ्हाडे, बाळासाहेब जाधव, उपाध्यक्ष सौरभ डोके, मानद सचिव डॉ. अर्जुन पाडेकर, खजिनदार अरुण हुलवळे तसेच संचालक किशोर कुऱ्हाडे, भाऊ कुऱ्हाडे, बबन सहाणे, उल्हास सहाणे, बाबू कुऱ्हाडे, शिवाजी गुंजाळ, जीवन शिंदे, दिनेश सहाणे, कैलास शेळके, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष प्रदीप गुंजाळ, देविदास पाडेकर, सम्राट कुऱ्हाडे, रमेश कुऱ्हाडे, शांताराम कुऱ्हाडे तसेच सर्व संचालक मंडळ यांनी समाधान व्यक्त केले.

शेटफळ तलावाचे आवर्तन ५ पासून सुरू होणार



- कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत सर्वानुमते निर्णय

■ शेठफळ (दै. संध्या)

इंदापूर तालुक्यातील शेटफळ तलावाच्या आवर्तनाबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, येत्या ५ नोव्हेंबरपासून कालव्याचे आवर्तन सुरू करण्याचा निर्णय कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत सर्वानुमते घेण्यात आला. रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६ रोजी इंदापूर येथे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली कालवा सल्लागार समितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत शेटफळ तलावाच्या आवर्तनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. उपस्थित मान्यवरांशी विचारविनिमय केल्यानंतर ५ नोव्हेंबर रोजी कालव्याचे आवर्तन सुरू करण्यावर सर्वांचे एकमत झाले. या निर्णयामुळे इंदापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध होण्यास मदत होणार असून, परिसरातील पाणीटंचाईच्या प्रश्नाला दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. या बैठकीत माजी मंत्री हर्षवर्धन पाटील हे दूरध्वनीद्वारे सहभागी झाले होते. तसेच उपविभागीय अभियंता दशरथ एकतपुरे, शाखा अभियंता विक्रम गायकवाड, शाखा अभियंता अभिजित वायसे, शेटफळ तलाव बचाव कृती समितीचे पंडितराव पाटील, बाळासाहेब करगळ यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

चोरांनी राज्य बदलले, पण शिक्रापूर पोलिसांची नजर चुकली नाही

- हरियाणा ते पुणे धडक कारवाई
- सर्व्हे मशिन चोरीप्रकरणी दोघे जेरबंद, तीन लाखांचा मुद्देमाल हस्तगत



■ शिक्रापूर (दै. संध्या)

डिंग्रजवाडी (ता.शिरूर) येथील कंपनीतून पाच लाख रुपये किमतीचे सर्व्हे मशिन चोरी करणाऱ्या आरोपींचा शिक्रापूर पोलिसांनी पर्दाफाश केला. तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी एका आरोपीला हरियाणातून,तर दुसऱ्याला पुण्यातून अटक केली. त्यांच्याकडून तीन लाख रुपये किमतीचा चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

डिंग्रजवाडी येथील इगवुड प्रा. लि.स्कॅलार स्पेसेस कंपनीमधून जमीन मोजणीसाठी वापरण्यात येणारे सर्व्हे मशिन असा पाच लाख रुपये किमतीचा मुद्देमाल चोरीला गेला होता.याप्रकरणी संग्राम शामराव मोरे (वय ४४, रा.चिखली प्राधिकरण, चिंचवड,पुणे) यांच्या फिर्यादीवरून शिक्रापूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३३४(१), ३०५, ३१७(२), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी तपासी अधिकारी पोलीस हवालदार अजित इंगवले व गुन्हे शोध पथकाला तपासाच्या सूचना दिल्या. त्यानुसार तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे हरी किशन जाटो (वय २४, रा.जोधपूर,राजस्थान) याला हरियाणा राज्यातून,तर अफाकजुद्दीन मुंताजिमुद्दीन काझी (वय ३६, रा.खडकी) याला विश्रांतवाडी,पुणे येथून ताब्यात घेण्यात आले.चौकशीत दोघांनी गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून तीन लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. आरोपींनी अशाच प्रकारचे आणखी गुन्हे केले आहेत का,याचा तपास सुरू आहे.

ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदिपसिंह गिल्ल,अपर पोलीस अधीक्षक डॉ. शुभम कुमार व शिरूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी रविंद्र भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या नेतृत्वात करण्यात आली.या पथकात पोलीस उपनिरीक्षक उमाकांत कुंजीर,पोलीस हवालदार अजित इंगवले,रोहिदास पारखे, अमोल दांडगे, शिवाजी चितारे, विश्वंभर वाघमारे, गणेश कुदळे तसेच पोलीस अंमलदार नारायण वाळके, राम जाधव, मच्छिंद्र निचीत,नागेश वाघमारे,भारत भोसले,ललित चकनारायण आणि मयूर कुंभार यांचा समावेश होता.पुढील तपास अजित इंगवले करीत आहेत.

जगाला हेवा वाटेल असा अजितदादांवरील चित्रपट नक्की तयार करणार : प्रवीण तरडे

'पहाटे सहा वाजता येणाऱ्या दादांच्या पावलांची मंत्रालयाच्या पायऱ्यांनाही उणीव भासत असेल'; बारामतीतील 'नांदी' साहित्य संमेलनात भावपूर्ण आठवणींना उजाळा

■ बारामती (दै. संध्या)

"जगाला हेवा वाटेल असा अजितदादांवरील चित्रपट मी नक्की तयार करणार," असा निर्धार सुप्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक व अभिनेते प्रवीण तरडे यांनी व्यक्त केला. "इतक्या बेशिस्त देशामध्ये पहाटे सहा वाजता उठून कामाला सुरुवात करणारा असा एक नेता होता.आज मंत्रालयाच्या पायऱ्यांनाही दादांची आठवण येत असेल.पहाटे सहा वाजता येणाऱ्या आमच्या नेत्याची पावले आता आम्हाला लागत नाहीत,अशी हळहळ त्या पायऱ्याही व्यक्त करत असतील," अशा भावपूर्ण शब्दांत त्यांनी स्व.अजितदादा पवार यांच्या कार्यसमर्पणाला अभिवादन केले.

पुणे येथे जानेवारी २०२७ मध्ये होणाऱ्या शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची 'नांदी' म्हणून बुधवारी, दि. २८ ऑक्टोबर रोजी बारामतीत आयोजित एकांकिका साहित्य संमेलनांतर्गत शारदानगर येथील डॉ.आप्पासाहेब पवार सभागृहातील तिसऱ्या सत्राच्या प्रकट मुलाखतीत प्रवीण तरडे बोलत होते.महाराष्ट्र साहित्य परिषद बारामती शाखा,नटराज नाट्य कला मंडळ आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद बारामती शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमातील सकाळचे एक सत्र विद्या प्रतिष्ठानच्या कमलनयन बजाज अभियांत्रिकी महाविद्यालयातही पार पडले. संमेलनाध्यक्षपदी ज्येष्ठ लेखक व एकांकिकाकार राज काझी होते. स्वागताध्यक्षपद ॲड.प्रिया गुजर महाडिक यांनी भूषविले.विवेक पांडकर यांनी घेतलेल्या प्रकट मुलाखतीतून प्रवीण तरडे यांच्या वैयक्तिक व कलात्मक प्रवासाबरोबरच अजितदादांविषयीच्या आठवणी उलगडल्या. स्व.अजितदादांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी प्रत्येक महिन्याच्या २८ तारखेला नटराज नाट्य कला मंडळाचे अध्यक्ष किरणदादा गुजर यांच्या पुढाकारातून बारामतीत विविध उपक्रम आयोजित केले जातात.त्याच अभिवादनपर उपक्रमांचा भाग म्हणून किरणदादा गुजर यांच्या संकल्पनेतून व संयोजनातून हे संमेलन पार पडले. साहित्य,रंगभूमी आणि नव्या पिढीतील कलाकार यांना जोडणाऱ्या या उपक्रमातून अजितदादांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. अजितदादांचे व्यक्तिमत्त्व हा चित्रपटाचा विषय असल्याचे सांगताना प्रवीण तरडे यांनी त्यांच्या विलक्षण शिस्तीचा, स्पष्टवक्तेपणाचा आणि सामान्य नागरिकांप्रती असलेल्या संवेदनशीलतेचा विशेष उल्लेख केला.त्यांच्या जीवनावर चित्रपट करण्यासंदर्भात अजितदादांशीही आपले बोलणे झाले होते.या विषयावरील विचार व तयारीची प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. अजितदादांच्या कार्यपद्धतीच्या आठवणी उलगडताना प्रवीण तरडे म्हणाले की,महाराष्ट्रभरातून नागरिक त्यांच्याकडे कामे घेऊन येत असत; मात्र त्यांच्या टेबलावर फायली पडून राहत नसत. होणाऱ्या कामाची प्रक्रिया लगेच सुरू केली जात असे.एखादे काम होणार नसेल,तर त्याबाबतही ते संबंधित व्यक्तीला तिथेच स्पष्टपणे सांगत.

नागरिकांनी विनाकारण हेलपाटे मारून आपला वेळ,पैसा आणि श्रम वाया घालवू नयेत,याची त्यांना जाणीव होती. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, खेडेपाडे आणि तेथील प्रश्नांची अजितदादांना सखोल माहिती होती.आपल्यापर्यंत आलेला माणूस कोणत्या परिस्थितीतून आला आहे,त्याच्या अडचणी आणि अपेक्षा काय आहेत,हे त्यांना समजत होते. त्यांच्या परखड बोलण्यामागे निर्मळ मन आणि काम मार्गी लावण्याची तळमळ होती.महाराष्ट्र इतक्या बारकाईने समजून घेतलेल्या या व्यक्तिमत्त्वावर चित्रपट का निघू नये,अशी भावना प्रवीण तरडे यांनी व्यक्त केली. बारामतीत आल्यानंतर कार्यक्रमापूर्वी अजितदादांच्या मातोश्रींची भेट घेऊन त्यांचे दर्शन घेतल्याचेही त्यांनी सांगितले. शारदानगरमधील अद्ययावत नाट्यगृह आणि बारामतीत उपलब्ध असलेल्या सुविधांचा उल्लेख करत त्यांनी पवार कुटुंबीयांच्या,विशेषतः अजितदादांच्या दूरदृष्टीचा गौरव केला.

नटराज नाट्य कला मंडळाशी असलेले आपले जिव्हाळ्याचे नाते उलगडताना प्रवीण तरडे म्हणाले, "आम्हा कलाकारांसाठी बारामती म्हणजे किरण गुजर आणि किरण गुजर म्हणजे बारामती." कोणत्याही कलाकाराने बारामतीत निश्चिंतपणे यावे.किरण गुजर यांना भेटल्यानंतर कार्यक्रमाच्या व्यवस्थेपासून कलाकारांच्या अडचणींपर्यंत सर्व प्रश्न मार्गी लागतात,असा विश्वास कलाकारांमध्ये असल्याचे त्यांनी सांगितले.कलाकारांना आधार देण्याचे,नवोदितांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे आणि नाट्यचळवळ सातत्याने पुढे नेण्याचे किरण गुजर व नटराज नाट्य कला मंडळाचे कार्य त्यांनी अधोरेखित केले. या 'नांदी' उपक्रमांतर्गत सकाळी विद्या प्रतिष्ठानच्या कमलनयन बजाज अभियांत्रिकी महाविद्यालयात झालेल्या सत्राची सुरुवात अजितदादांच्या प्रतिमेस अभिवादन करून झाली. उद्घाटक व विद्या प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष ॲड.ए.व्ही.प्रभुणे यांनी शंभराव्या साहित्य संमेलनासाठी शुभेच्छा दिल्या.प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध लेखक,दिग्दर्शक व अभिनेते योगेश सोमण यांनी 'एकांकिका लेखन, दिग्दर्शन आणि अभिनय' या विषयावर मार्गदर्शन केले.यावेळी विद्या प्रतिष्ठानच्या सचिव ॲड.नीलिमाताई गुजर,विश्वस्त डॉ.राजीव शाह आणि विश्वस्त किरण गुजर उपस्थित होते. या सत्रात अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्वप्नील कुचेकर दिग्दर्शित 'वामन आख्यान' ही एकांकिका सादर केली.योगेश सोमण यांनी विद्यार्थी कलाकारांच्या सादरीकरणाचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या. या सत्राच्या आयोजनासाठी किरण गुजर,संजय जाधव,विवेक पांडकर आणि प्राचार्य डॉ.सुधीर लांडे यांचे प्रोत्साहन लाभले. नियोजन व अंमलबजावणीसाठी अनिल डिसले,दीपक सोनवणे,गौरी भोईटे,राजकुमार मुळे आणि स्वप्नील कुचेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.



सुमारे पंचवीस ते तीस वर्षांपूर्वी आपल्या आयुष्यातील पहिली एकांकिका नटराज करंडक स्पर्धेत सादर केल्याची आठवण प्रवीण तरडे यांनी सांगितली.नटराज करंडक मिळविणे हे आपले स्वप्न होते आणि ते आपण पूर्ण केले, असे ते म्हणाले. ही स्पर्धा आजही सुरू असल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला. "राज काझी आणि योगेश सोमण यांसारख्या दिग्गजांच्या एकांकिका पाहत आम्ही मोठे झालो," असे सांगत त्यांनी ज्येष्ठ रंगकर्मींबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.राज काझी,योगेश सोमण आणि प्रवीण तरडे या तिघांनीही आपल्या कलाप्रवासाच्या सुरुवातीला नटराज करंडकात पहिली एकांकिका सादर केल्याचा उल्लेख केला.त्यांच्या आठवणींतून कलाकारांच्या जडणघडणीतील या स्पर्धेचे योगदान अधोरेखित झाले. शेतकरी कुटुंबातील बालपण, वारकरी संस्कार,घरातील पारायण, भजन-कीर्तन,कुस्तीची परंपरा आणि वाचनाची आवड यांचा आपल्या जडणघडणीवर झालेला प्रभाव प्रवीण तरडे यांनी सांगितला.नाट्यक्षेत्रातील कारकिर्दीला सुरुवातीला झालेला कौटुंबिक विरोध आणि अथक मेहनतीतून मिळविलेले यश याविषयीही त्यांनी मनमोकळेपणाने संवाद साधला. प्रत्येक व्यक्ती आपल्या मातीचा गंध घेऊन येते.त्यामुळे आपल्या भाषेविषयी किंवा दिसण्याविषयी न्यूनगंड बाळगू नका.अंतर्बाह्य पारदर्शी राहा आणि जसे आहात तसेच व्यक्त व्हा,असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. अभिनय करताना आपण अभिनय करीत आहोत,असे प्रेक्षकांना जाणवता कामा नये.त्यासाठी उत्तम निरीक्षणशक्ती, अनुभव, सातत्यपूर्ण वाचन आणि भूमिकेचा सखोल विचार आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. समाजमाध्यमांवर सहज उपलब्ध होणाऱ्या माहितीचे ज्ञानात रूपांतर करता आले पाहिजे.ज्याच्याकडे ज्ञान आहे,त्याच्याकडून शिकण्याची तयारी ठेवावी,असेही त्यांनी सांगितले. तिसऱ्या सत्राला ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या विश्वस्त सुनंदा पवार प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.त्यांच्या हस्ते रोप व सन्मानचिन्ह देऊन प्रवीण तरडे यांचा सत्कार करण्यात आला. त्यांनी उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. ॲड.अमरेंद्र महाडिक यांनी प्रवीण तरडे यांचा परिचय करून दिला.

यश मिळाल्यानंतरही कुटुंबाशी, मित्रांशी आणि शेतीशी असलेले नाते जपण्याचे महत्त्व प्रवीण तरडे यांनी अधोरेखित केले.वडिलांची पडद्यावर येण्याची इच्छा पूर्ण केल्याची,तसेच संसारासाठी अभिनयातून दूर गेलेल्या पत्नीला पुन्हा अभिनयासाठी प्रोत्साहन दिल्याची आठवण त्यांनी सांगितली.आपल्या वाटचालीतील पत्नीच्या सहकार्याचा त्यांनी कृतज्ञतेने उल्लेख केला.कितीही मोठे झालो,तरी हक्काने एकेरी संबोधणारे,पाठीवर शाबासकीची थाप देणारे आणि प्रसंगी चुका दाखविणारे मित्र आयुष्यात असावेत,असेही ते म्हणाले. त्यांच्या दिलखुलास संवादातून रांगड्या व्यक्तिमत्त्वामागील संवेदनशील माणूस श्रोत्यांसमोर उलगडला.